

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



# जयकर ज्ञानस्रोत केंद्र

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

# अहवाल

## (दि.०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५)

# पुणे विद्यापीठ गीत

## ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतो
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## जयकर ज्ञानस्रोत केंद्र

## “वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

## उपक्रम अहवाल कार्यक्रम पुस्तिका

**(दि. १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५)**



**डॉ. सुरेश गोसावी**
कुलगुरु



**डॉ. पराग काळकर**
प्र-कुलगुरू



**डॉ. ज्योती भाकरे**
प्र. कुलसचिव



**डॉ. संजय कौतिकराव देसले**

**प्र. संचालक (जयकर ज्ञानस्रोत केंद्र)**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# जयकर ज्ञानस्रोत केंद्र

## “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” समिती

| अ.क्र. | समिती सदस्य | हुद्दा |
|---|---|---|
| १ | डॉ. सुरेश गोसावी | कुलगुरू |
| २ | डॉ. प्रराग काळकर | प्र-कुलगुरू |
| ३ | डॉ. ज्योती भाकरे | प्र. कुलसचिव |
| ४ | डॉ. संजय देसले | प्र. संचालक |
| ५ | डॉ. नागेश लोंढे | सहाय्यक ग्रंथपाल |
| ६ | डॉ. प्रियांका वाडेकर | सहाय्यक ग्रंथपाल |
| ७ | डॉ. रजनी मेश्राम | सहाय्यक ग्रंथपाल |
| ८ | कृष्णा वळवी | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |
| ९ | रामदास नवले | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |
| १० | रेणुका पावसे | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |
| ११ | शुभांगी मुंडलिक | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |
| १२ | वृषाली खिलारी | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |
| १३ | प्रसन्न सोनार | तांत्रिक सहाय्यक (ग्रंथालय) |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | कार्यक्रम / उपक्रम | पान क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय | i |
| २. | प्रस्तावना | ii |
| ३. | कार्यक्रम पत्रिका | १ |
| ४. | स्वच्छता अभियान | २ |
| ५. | ग्रंथ प्रदर्शन | ५ |
| ६. | वाचन कौशल्य कार्यशाळा - व्याख्याते : डॉ. राजेंद्र कुंभार | ९ |
| ७. | सामूहिक वाचन | १६ |
| ८. | वाचन संवाद (वाचक-लेखक परिसंवाद)<br>डॉ. सदानंद मोरे : महाराष्ट्राची वाचन संस्कृती<br>डॉ. राजीव बर्वे : वाचन संस्कृती आणि प्रकाशन विश्व<br>अंजली कुलकर्णी : माझा लेखन प्रवास | <br>२०<br>२३<br>२५ |
| ९. | कथा-कथन स्पर्धा | २७ |
| १०. | पुस्तक परीक्षण स्पर्धा | ३१ |
| ११. | पारितोषिक वितरण समारंभ | ३३ |
| १२. | पारितोषिक प्राप्त पुस्तक परीक्षणे आणि कथा | ३८ |
| १३. | जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि संलग्नित महाविद्यालये यांचा Book Review Portal Project (प्रकल्प) | ७५ |
| १४. | परीशिष्टे<br>पुस्तक परीक्षण पोर्टल वर्तमानपत्रातील बातम्या<br>जयकर ज्ञानस्रोत केंद्राने लावलेले Banners | <br>१०४<br>१०६ |

# संपादकीय

प्रिय वाचकवृंद हो !

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हे महाराष्ट्र शासनाचे अभियान महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक नागरिक, विद्यार्थी, संशोधक यांच्यामध्ये वाचनाची अभिवृद्धी व्हावी या उद्देशाने सुरु करण्यात आले आहे. वाचनाने व्यक्तिमत्वाचा विकास होतो. मानवाच्या विचार शक्तीला चालना मिळते. पर्यायाने मानवी जीवन समृद्ध होते. महात्मा ज्योतीराव फुले यांनी म्हटलंच आहे,

विद्ये विना मती गेली। मती विना नीती गेली॥

नीती विना गती गेली। गती विना वित्त गेले॥

वित्ता विना शुद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले॥

ग्रंथ हे ज्ञानाचे भांडार आहे तर, वाचन ही त्या ज्ञानभांडाराची गुरुकिल्ली आहे. अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याचा मार्ग म्हणजे वाचन.

सर्व वाचक, विद्यार्थी, संशोधक, शिक्षक-शिक्षकेतर सेवक यांना आम्ही आवाहन करतो की, तुम्ही या वाचन संकल्पात तर मोठ्या संख्येने सहभागी झालेलेच आहात पण तुमचे वाचन अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता निरंतर वाचत रहा. हीच तुमच्या जीवनाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे असे समजा.

वाचन संकल्प आपल्याला अधिक सुजाण आणि समृद्ध नागरिक बनवेल.

धन्यवाद.

# प्रस्तावना



“वाचन संस्कृती घरोघरी, तिथे फुले ज्ञानपंढरी”

महाराष्ट्र शासन आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमांतर्गत जयकर ज्ञानस्रोत केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि. ३० डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले.

अलीकडच्या काळात विविध प्रकारच्या सोशल मीडियातील साधनांचा वापर करून कमी वेळेत जास्त माहिती मिळते ह्या गैरसमजामुळे विद्यार्थी, वाचक, संशोधक पुस्तकांपासून दुरावत चालले आहेत असे निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र शासन आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाने “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” हा उपक्रम राबविण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांना सूचना निगर्मित केल्या.

विद्यार्थ्यांना वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी, वाचन संस्कृती वाढविण्यासाठी दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जयकर ज्ञानस्रोत केंद्रात हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये ग्रंथालय स्वच्छता, सामूहिक वाचन, लेखक वाचक संवाद, पुस्तक परीक्षण स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शन, कथा-कथन स्पर्धा, पारितोषिक वितरण समारंभ इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले.

या उपक्रमाचे औचित्य साधून जयकर ज्ञानस्रोत केंद्राने पुढाकार घेऊन जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सहाय्यक ग्रंथपाल आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील ग्रंथपाल यांच्या समित्या स्थापन केल्या. पुस्तक परीक्षणे अपलोड करण्यासाठी वेब पोर्टल तयार करण्यात आले. वेब पोर्टलवर पुस्तक परीक्षणे अपलोड करण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथपाल उत्साहाने सहभागी झाले आणि छापील तसेच व्हिडिओ स्वरूपातील पुस्तक परीक्षणे या पोर्टलवर अपलोड करण्यात आली. जयकर ज्ञानस्रोत केंद्राने "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत हा एक चांगला Free Open Book Resource तयार केला आहे, जो भावी काळातही वाचक, ग्रंथपाल, शिक्षक अशा सर्वांसाठी निरंतर उपलब्ध राहील.

पुस्तक परीक्षण स्पर्धा, कथा-कथन स्पर्धा, सामूहिक वाचन असे उपक्रम राबविण्यामागे वाचकांनी, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तके हाताळावीत, वाचावीत हाच उद्देश होता. निरंतर वाचनाने ज्ञानात भर पडते; मानवी जीवन समृद्ध होते; व्यक्तिमत्व विकास होतो व त्यातूनच व्यक्तीला समाजात मानसन्मान मिळण्यास मदत होते. कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी ग्रंथांचे व वाचनाचे महत्त्व अतिशय सुरेख वर्णन केले आहे. ते म्हणतात,

या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती,

ग्रंथ शिकविती माणुसकी अन्, ग्रंथ शिकविती शांती ।

चला तर मग एक पाऊल पुढे टाकूया वाचन संस्कृती जोपासण्यासाठी, जतन करण्यासाठी !

**संजय कौतिकराव देसले**
**(प्र. संचालक)**
**जयकर ज्ञानस्रोत केंद्र**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जयकर ज्ञानस्रोत केंद्र**

**"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"**

कार्यक्रम पत्रिका

| **अ.क्र** | **दिनांक** | **कार्यक्रमाचे स्वरूप** | **टिपणी** |
|---|---|---|---|
| **१** | २९ डिसेंबर २०२४ | ग्रंथालयाची साफसफाई | ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व सेवकांनी साफसफाईचे काम केले. |
| **२** | ३० व ३१ डिसेंबर २०२४ | पुस्तक प्रदर्शन भरविणे | दुर्मिळ, संदर्भ व प्रसिद्ध पुस्तकांचे प्रदर्शन |
| **३** | १ जानेवारी २०२५ | वाचन कौशल्य कार्यशाळा :<br>वेळ- सकाळी ११:०० ते १२:३० | विषय - "व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन: का वाचावे, काय वाचावे, कसे वाचावे"<br>व्याख्याते- डॉ. राजेंद्र कुंभार |
| **४** | २ जानेवारी २०२५ | सामूहिक वाचन<br>वेळ- दुपारी ४:०० ते ५:३०<br>स्थळ : मुख्य इमारतीमागील हिरवळ | कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, व्यवस्थापन परिषद सदस्य यांचा सहभाग |
| **५** | ३ जानेवारी २०२५<br>६ जानेवारी २०२५<br>७ जानेवारी २०२५ | लेखक व विद्यार्थी वाचन संवाद<br>लेखक आपल्या भेटीला | डॉ. सदानंद मोरे<br>डॉ. राजीव बर्वे<br>कवयित्री अंजली कुलकर्णी |
| **६** | ८ जानेवारी २०२५ | कथा-कथन स्पर्धेचे आयोजन | विद्यपीठातील सर्व विद्यार्थी |
| **७** | १६ जानेवारी २०२५ | पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन | विद्यपीठातील सर्व विद्यार्थी |
| **८** | १ जानेवारी २०२५ पासून निरंतर | Book Review Portal Project | जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि संलग्नित महाविद्यालये |
| **९** | २६ जानेवारी २०२५ | प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात विजेत्यांच्या नावांची घोषणा | मा. कुलगुरुंनी भाषणात बक्षीसपात्र विद्यार्थ्यांची नावे जाहीर केली. |
| **१०** | 11 फेब्रुवारी २०२५ | पारितोषिक वितरण समारंभ :<br>प्रोत्साहनपर रोख बक्षीसे आणि प्रमाणपत्रांचे वितरण<br>वेळ- दुपारी २:०० ते ६:०० | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६व्या वर्धापन दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमात पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. |

## स्वच्छता अभियान

## दि. २९/१२/२०२४ सकाळी १०.३० ते सायं ५.००

शासनाच्या वेळापत्रकानुसार पहिला उपक्रम हा "ग्रंथालय स्वच्छता मोहिम" हा होता. डॉ. देसले यांनी स्वच्छता उपक्रम ग्रंथालयात राबविण्यासाठी ग्रंथालयाच्या संपूर्ण स्टाफने सहभागी होण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार केल्या. त्यामध्ये सहाय्यक ग्रंथपाल, तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय परिचर, शिपाई, ग्रंथालय कार्यालयातील सेवक, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी (ट्रेनी), ग्रंथालयातील स्वच्छता कर्मचारी या सर्वांचा सहभाग होता.

प्रत्येक समितीमध्ये सहाय्यक ग्रंथपाल, तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी ट्रेनी व स्वच्छता कर्मचारी असे गट तयार केले. ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारापासून stack रूम पर्यंत, तसेच वाचन कक्ष, पुस्तकांची कपाटे या सर्वांची स्वच्छता करण्यात आली. तसेच ग्रंथालयाच्या विविध विभागांची म्हणजेच खरेदी विभाग, नियतकालिक विभाग, दुर्मिळ ग्रंथसंग्रह विभाग, स्टोअर रूम, डिजीटल ग्रंथालय, तसेच लेक्चर हॉल, कार्यालय, संचालकांची खोली, सहाय्यक ग्रंथपालांच्या केबिन्स, तसेच ग्रंथालयाच्या आजूबाजूचा परिसर या सर्व विभागांची स्वच्छता मोहिमे अंतर्गत करण्यात आली.

दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी जयकर ज्ञानस्रोत केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात हा उपक्रम यशस्वी रीतीने राबविला. संबंधित उपक्रमाची छायाचित्रे संकेतस्थळावर टाकली आहेत.

**स्वच्छता गट क्र. १** **स्वच्छता गट क्र. २**

| **अ.क्र** | **कर्मचाऱ्यांचे नाव** | **कर्मचाऱ्यांचे पद** | **अ.क्र** | **कर्मचाऱ्यांचे नाव** | **कर्मचाऱ्यांचे पद** |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. कृष्णा वळवी | तांत्रिक सहाय्यक | १) | श्री. प्रसन्न सोनार | तांत्रिक सहाय्यक |
| २) | अमोल टकले | ट्रेनी | २) | कुंडलिक टकले | परिचर |
| ३) | विलास मल्हारी | हमाल | ३) | विशाल झांजरे | ट्रेनी |
| ४) | स्वच्छक कर्मचारी | स्वच्छक कर्मचारी | ४) | स्वच्छक कर्मचारी | स्वच्छक कर्मचारी |

**स्वच्छता गट क्र. ३**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्यांचे पद |
|---|---|---|
| १) | श्री रामदास नवले | तांत्रिक सहाय्यक |
| २) | भूषण राजपूत | परिचर |
| ३) | प्रसाद डवले | ट्रेनी |
| ४) | स्वच्छक कर्मचारी | |

**स्वच्छता गट क्र. ४**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्यांचे पद |
|---|---|---|
| १) | शुभांगी मुंडलिक | तांत्रिक सहाय्यक |
| २) | अश्विनी माळेकर | ट्रेनी |
| ३) | राजश्री पवार | लिपिक |
| ४) | स्वच्छक कर्मचारी | स्वच्छक कर्मचारी |

**स्वच्छता गट क्र. ५**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्यांचे पद |
|---|---|---|
| १) | रेणुका पावसे | तांत्रिक सहाय्यक |
| २) | आदिती चव्हाण | ट्रेनी |
| ३) | शोभा मगर | लिपिक |
| ४) | स्वच्छक कर्मचारी | स्वच्छक कर्मचारी |

**स्वच्छता गट क्र. ६**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्यांचे पद |
|---|---|---|
| १) | श्री मुकुंद पांडे | कक्षाधिकारी |
| २) | वृषाली खिलारी | तांत्रिक सहाय्यक |
| ३) | राजाराम घुंगरड | लिपिक |
| ४) | दिलीप भिलावेकर | परिचर |

वरील समित्यांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ग्रंथालय स्वच्छतेचे काम संचालक तसेच सहाय्यक ग्रंथपाल यांच्या देखरेखीखाली चांगल्या प्रकारे केले. त्यामध्ये पुस्तके, कपाटे, वाचनकक्ष आणि परिसराची स्वच्छता करण्यात आली.

## ग्रंथालयाची साफसफाई या उपक्रमाची काही छायाचित्रे :













# ग्रंथ प्रदर्शन

## ३० डिसेंबर २०२४ ते १६ जानेवारी २०२५

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमातील दुसरा महत्वाचा उपक्रम म्हणजे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन. शासनाच्या वेळापत्रकानुसार दि. ३० व ३१ डिसेंबर २०२४ रोजी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करावयाचे होते. त्यानुसार जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालकांनी ग्रंथालयातील सर्व कर्मचार्यांना सूचना दिल्या. ग्रंथालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल, तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय परिचर, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी या सर्वांनी मिळून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरतील अशी पुस्तके ग्रंथालयाच्या संग्रहातून प्रदर्शनात ठेवण्यासाठी काढली. त्यामध्ये राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम, सुधा मूर्ती यांची तसेच काही वैज्ञानिकांची चरित्रे, काही प्रसिद्ध आत्मचरित्रे, काव्यसंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील पुस्तके, आहिल्याबाई होळकरांवरील पुस्तके, काही ऐतिहासिक पुस्तके, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्रातील दुर्मिळ पुस्तके, हस्तलिखिते, तसेच भूर्जपत्रावरील पुस्तके, धार्मिक पुस्तके, काही पुरस्कार प्राप्त लेखकांची पुस्तके, अशा सर्व विषयांमधील प्रातिनिधित्व करणाऱ्या पुस्तकाचे प्रदर्शन भरविले. ग्रंथ प्रदर्शनासाठी वेगवेगळ्या विषयांमधील लागणारी पुस्तके निवडण्यासाठी समित्या स्थापन करण्यात आल्या.

समिती क्रमांक : १ समिती क्रमांक : २

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद | अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद |
|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ. रजनी मेश्राम | सहाय्यक ग्रंथपाल | १) | डॉ.प्रियांका वाडेकर | सहाय्यक ग्रंथपाल |
| २) | श्री. कृष्णा वळवी | तांत्रिक सहाय्यक | २) | रेणुका पावसे | तांत्रिक सहाय्यक |
| ३) | अमोल टकले | ट्रेनी | ३) | अदिती चव्हाण | ट्रेनी |
| ४) | भूषण राजपूत | ग्रंथालय परिचर | ४) | विशाल झांजरे | ट्रेनी |
| या समितीने मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, ललित लेख, समीक्षात्मक पुस्तके, अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | | या कमिटीने चरित्रे, आत्मचरित्रे, ललितकला साहित्य, दलित साहित्य, अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | |

समिती क्रमांक : ३

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. नागेश लोंढे | सहाय्यक ग्रंथपाल |
| २) | अश्विनी माळेकर | ट्रेनी |
| ३) | स्नेहा शेलार | ट्रेनी |
| ४) | प्रतिक जगताप | ट्रेनी |
| या कमिटीने विज्ञान कथा, तसेच प्रसिद्ध संशोधक व वैज्ञानिकांची पुस्तके, आधुनिक तंत्रज्ञाना संबधी काही पुस्तके अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | |

समिती क्रमांक : ४

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद |
|---|---|---|
| १) | शुभांगी मुंडलिक | तांत्रिक सहाय्यक |
| २) | अजित फलके | ट्रेनी |
| ३) | प्रसाद डवले | ट्रेनी |
| ४) | कुंडलिक टकले | ग्रंथालय परिचर |
| या कमिटीने हिंदी साहित्यातील काव्य, कथाये, उपन्यास, वैचारिक तसेच प्रेरणादाई पुस्तके अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | |

समिती क्रमांक : ५

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद |
|---|---|---|
| १) | वृषाली खिलारी | तांत्रिक सहाय्यक |
| २) | अश्विनी चिकटे | ट्रेनी |
| ३) | प्रमिला राउत | ट्रेनी |
| ४) | सुप्रिया जाधव | ट्रेनी |
| या कमिटीने ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय व भौगोलिक घडामोडींवर आधारित पुस्तके तसेच मानसशास्त्रीय पुस्तके व, धार्मिक ग्रंथ, अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | |

समिती क्रमांक : ६


| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे | पद |
|---|---|---|
| १) | रामदास नवले | तांत्रिक सहाय्यक |
| २) | प्रसन्न सोनार | तांत्रिक सहाय्यक |
| ३) | भूषण राजपूत | ग्रंथालय परिचर |
| ४) | शितल तुपे | ट्रेनी |
| या कमिटीने compact section मधील आणि दुर्मिळ स्वरूपातील इतिहास, कला, धर्म, साहित्य, पोथ्या, जुने science fiction, चारित्रात्मक अशी साधारणपणे २५० पुस्तके प्रदर्शनासाठी काढली. | | |

विद्यार्थ्यांना या उपक्रमाविषयी माहिती व्हावी यासाठी विद्यापीठात ठिकठिकाणी मोठमोठे फलक (Banners) लावण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ग्रंथप्रदर्शनाविषयीचे परिपत्रक टाकण्यात आले.

विद्यापीठातील सर्व विभागातील विभाग प्रमुखांना जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले यांनी इमेल द्वारे ग्रंथप्रदर्शनाविषयी माहिती दिली. डॉ. देसले यांनी “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमाचे औचित्य साधून एक वेबपोर्टल तयार केले. सावित्रीबाई बाई फुले विद्यापीठातील विभागीय ग्रंथलयांचे ग्रंथपाल यांना त्यात समाविष्ट केले. ग्रंथ प्रदर्शना संबंधी त्यांनाही माहिती देण्यात आली. विद्यापीठातील शिक्षक शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, तसेच ग्रंथालयात येणारे तात्पुरते वाचक, संशोधक विद्यार्थी, विद्यापीठातील वेगवेगळ्या विभागाचे विभाग प्रमुख या सर्वांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली.

ग्रंथ प्रदर्शन दालनात जवळपास १५०० पुस्तकांचे प्रदर्शन भरविले होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. काही संशोधक वाचकांनी आणखी कोणती पुस्तके ठेवावीत याविषयी ग्रंथालय कर्मचाऱ्यांकडे आपले मत व्यक्त केले. त्यांच्या सूचनांनुसार ती पुस्तकेही प्रदर्शनात ठेवण्यात आली. ग्रंथ प्रदर्शन दालनानजीक अभिप्राय वही ठेवली होती. त्यात अनेक वाचकांनी त्यांचे अभिप्राय नोंदविले तसेच काही सूचनाही केल्या. या ग्रंथ प्रदर्शनास भेट देणाऱ्या विद्यापीठातील विविध विभागांतील विद्यार्थी वाचकांना, तसेच संशोधक विद्यार्थ्यांना वाचनासाठी त्यांच्या अभ्यासाच्या विषया व्यतिरिक्त अवांतर पुस्तके त्यात कथा, कादंबऱ्या, चरित्रे किंवा काही ऐतिहासिक पुस्तके वाचता यावीत म्हणून ग्रंथालयाच्या संचालकांना ग्रंथालयाच्या देव-घेव विभागास विशेष सूचना दिल्या. विद्यार्थ्यांस २ पुस्तके घेता येत असतील तर त्याला ३ पुस्तके override करून द्या. जेणेकरून विद्यार्थी जास्तीत जास्त पुस्तके वाचतील. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल हा त्यांचा उद्देश होता. या त्यांच्या उपक्रमाचा फायदा ग्रंथालयातील विद्यार्थी वाचकांनी घेतल्याचे दिसून आले. शासनाच्या परिपत्रकानुसार हे ग्रंथ प्रदर्शन ३० डिसेंबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ असे दोन दिवस भरवावे असे निर्देश दिलेले होते. परंतु जयकर ज्ञानस्रोत केंद्राने हे प्रदर्शन विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद पाहून दि. ०१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत विद्यार्थांसाठी खुले ठेवले होते. बहुसंख्य विद्यार्थी वाचकांनी याचा लाभ घेतला.

ग्रंथ प्रदर्शन या उपक्रमाची काही क्षणचित्रे :














# वाचन कौशल्य कार्यशाळा

## व्याख्यान : व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन : का वाचावे, काय वाचावे, कसे वाचावे

## व्याख्याते : डॉ. राजेंद्र कुंभार

## बुधवार दि. ०१/०१/२०२५ सकाळी ११.०० ते २.००

वाचक आणि वाचन साहित्य यांच्यातील दुवा म्हणून ग्रंथालये फार पूर्वीपासून काम करत आहेत. मानव इतर प्राण्यांहून पुढारलेला आहे यात त्याने केलेली पुस्तकांची निर्मिती आणि वाचन करण्याची कला या दोन गोष्टींचा फार महत्वाचा वाटा आहे.

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत दिनांक २० डिसेंबर २०२४ च्या शासन परिपत्रक क्रमांक 'संकीर्ण - 2024 / ई- 905221 / समन्वय' मध्ये दिलेल्या क्रमांक २ च्या सूचनेनुसार वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करणे अपेक्षित होते. ही कार्यशाळा दिनांक १ जानेवारी २०२५ या दिवशी आयोजित करण्यात यावी अशीही सूचना या परिपत्रकात दिलेली होती. निरंतर व सतत वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत, कशी वाचावीत याबाबत मार्गदर्शन करणारी अशा स्वरूपाची ही कार्यशाळा असावी. या कार्यशाळेत वाचन कौशल्याविषयी मुलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगाव्यात. तसेच "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमाचा भाग म्हणून घेण्यात येणार असलेल्या पुस्तक परीक्षण आणि पुस्तक कथन (कथा-कथन) या दोन्ही स्पर्धांबाबत माहिती द्यावी. विद्यार्थ्यांना या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करुन त्यांची नाव नोंदणी करावी इत्यादी बाबी परिपत्रकात दिल्याप्रमाणे करणे अपेक्षित होते.

शासनाच्या या परिपत्रकाला अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जयकर ज्ञानस्रोत केंद्राने व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन : का वाचावे, काय वाचावे, कसे वाचावे या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. राजेंद्र कुंभार यांचे श्रोत्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन

जयकर ज्ञानस्रोत केंद्राद्वारे करण्यात आले. डॉ. राजेंद्र कुंभार यांचे वाचन, व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन या विषयांवर विशेष प्रभुत्व असून या विषयांवर ते अनेक ठिकाणी व्याख्याने देत असतात.

शासन परिपत्रकाला अनुसरून बुधवार दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जयकर ज्ञानस्रोत केंद्राने वाचन कौशल्य कार्यशाळेत **"व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन : का वाचावे, काय वाचावे, कसे वाचावे"** या व्याख्यानाचे आयोजन केले.

या कार्यशाळेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माननीय कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले आणि व्याख्याते डॉ. राजेंद्र कुंभार व्यासपीठावर उपस्थित होते. श्रोत्यांमध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य मा. मुकुंद पांडे, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सदानंद बनसोडे, माजी ग्रंथपाल डॉ. भाऊसाहेब पानगे, जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सहाय्यक ग्रंथपाल, तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय परिचर, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी, सर्व सेवकवर्ग, अनेक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवकवर्ग, आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीलाच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि जयकर ज्ञानस्रोत केंद्र या सर्वांचे हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आभार मानून उपस्थित सर्व श्रोत्यांचे स्वागत केले.

त्यानंतर डॉ. संजय देसले यांनी प्रास्तविक भाषण केले. आपल्या प्रास्तविक भाषणात डॉ. देसले यांनी या उपक्रमाविषयी तसेच विद्यापीठ व जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या त्यातील भूमिकेविषयी माहिती दिली. त्याचबरोबर आत्तापर्यंत घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेऊन यानंतर पुढील पंधरा दिवसांत राबविण्यात येणार असलेल्या कार्यक्रमांविषयी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी त्यांनी जयकर ज्ञानस्रोत केंद्राने आयोजन केलेल्या पुस्तक परीक्षण स्पर्धा आणि कथा-कथन

स्पर्धा या स्पर्धांची माहिती देऊन या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहनही केले.

त्यानंतर व्याख्याते डॉ. राजेंद्र कुंभार यांचा परिचय जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या सहाय्यक ग्रंथपाल डॉ. रजनी मेश्राम यांनी करुन दिला. त्यांचा परिचय करून देताना डॉ. मेश्राम यांनी डॉ. कुंभार यांच्या आजवरच्या विविध ठिकाणी केलेल्या शैक्षणिक सेवेविषयी; आत्तापर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांविषयी आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झालेल्या संशोधन प्रकल्प व लेखांविषयी आणि ते प्रामुख्याने ज्या विषयांवर व्याख्याने देतात त्या विषयांची माहिती दिली.

कार्यक्रमात त्यानंतर व्याख्यात्यांचा आणि व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांच्या हस्ते व्याख्याते डॉ. राजेंद्र कुंभार यांचा सत्कार करण्यात आला. तर जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापुरकर यांचा आणि विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. ज्योती भाकरे यांनी भूषविले.

सत्कार समारंभ झाल्यानंतर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापुरकर यांनी त्यांचे मनोगत थोडक्यात व्यक्त केले. त्यामध्ये त्यांनी मित्रपरिवारामध्ये ग्रंथभिशी सुरू करण्याची अभिनव कल्पना दिली. ग्रंथभिशी ही आपल्याला स्वतःला, आपल्या परिवारातील सदस्यांना तसेच मित्रपरिवाराला साहित्यिक समृद्धी देते असेही त्यांनी स्वानुभवातून सांगितले.

डॉ. रवींद्र शिंगणापुरकर यांच्या मनोगतानंतर डॉ. राजेंद्र कुंभार यांच्या व्याख्यानाला सुरुवात झाली. वाचाल तर वाचाल; वाचनाने माणूस समृद्ध होतो; वाचन कौशल्य विकास हा जीवन कौशल्यांचा पाया असतो; आपण तेच असतो, जे आपण वाचतो (We are, what we read) ही आणि अशी आणखी बरीच वाक्ये आपण वाचना विषयी वाचत असतो; ऐकत असतो. पण आपण का वाचलं पाहिजे? काय वाचलं पाहिजे? आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कोणते वाचन केले

पाहिजे? वाचलेलं समजण्यासाठी काय केलं पाहिजे? रोज वाचन करावं का? किती वेळ वाचन केलं पाहिजे? दिवसाच्या कोणत्या वेळी वाचन करावे? अभ्यासाची पुस्तके वाचली तर त्याला वाचन म्हणावे का? त्या वाचनाने व्यक्तिमत्व विकास होतो का? वाचकांच्या मनातील या आणि अशा अनेक प्रश्नांची, शंकांची उत्तरे डॉ. कुंभार सरांच्या व्याख्यानातून श्रोत्यांना मिळाली.

आपल्या व्याख्यानात डॉ. कुंभार म्हणाले, वाचन आणि अभ्यास यात फरक आहे. अभ्यासक्रमाची पुस्तके सोडून आणि परीक्षेत उत्तरे लिहायची आहेत म्हणून जे वाचन केले जाते ते सोडून इतर सगळ्या प्रकारचे वाचन हे अवांतर वाचन असते. परीक्षेसाठी केलेले वाचन तुम्हाला परीक्षेत गुण मिळवून देईल पण तुमचे व्यक्तिमत्व विकसित करणार नाही. हे काम अवांतर वाचनातूनच होईल.

वाचनाचा सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे वाचणाऱ्याचा शब्दसंग्रह वाढतो आणि शब्दसामर्थ्य वाढते. समृध्द जगणं, आत्मसन्मानाने जगणं पुस्तक वाचनातूनच शक्य आहे. Technical Writing, Script Writing सारख्या क्षेत्रांमध्ये करियर करण्यासाठी Technology चे ज्ञान असलेच पाहिजे असे नाही पण शब्दांवर प्रभुत्व मात्र नक्कीच असावे लागते.

काय वाचावे हे सांगताना डॉ. कुंभार यांनी प्रेरणादायी चरित्रे आणि आत्मचरित्रे जरूर वाचावीत असे सांगितले. त्याचप्रमाणे सृजनशीलता, सर्जनशीलता आणि नवनिर्मिती (creativity innovation) यासाठी पुस्तके वाचणे ही प्राथमिक गरज असते. वाचनाने मेंदूला खाद्य पुरविले जाते. विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये येणे हा शिक्षणाचा मूलभूत हेतु वाचनाने साध्य होतो. पुस्तके ही कल्पनांनी भरलेली असतात. वाचनामुळे वाचणाऱ्याला प्रश्न पडतात आणि त्यांची उत्तरे शोधताना वाचकांतील सृजनशीलता, सर्जनशीलता वाढीस लागते. फुले, शाहू, आंबेडकर यांसारखे समजनेते, वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ यांच्यातील विलक्षणता ही त्यांच्या वाचनातून आणि त्यामुळे त्यांना पडणाऱ्या प्रश्नांमधून आलेली होती. विध्वंशाची फळं, झाडाझडती, रिंगाण, अशी पुस्तके विस्थापितांचे / स्थलांतरितांचे प्रश्न मांडतात.

साहित्य विश्वातील गूढकथा, रहस्यकथा, Science Fictions, Fantasies यांना वयाची मोजमापे न लावता सर्वांनी वाचावीत. अशा वाचनातून कोणत्याही समस्येची उकल कशी करावी याचे कौशल्य विकसित होते. विशेषत: या कौशल्याचा फायदा संशोधन करताना विश्लेषण (Interpretation, Analysis) करताना होतो. Campus Interviews मध्ये ज्यांची निवड होते त्यांचा अभ्यास केला असता, ज्यांचे अवांतर वाचन भरपूर आहे त्यांची निवड होत असल्याचे दिसून येते. वाचनामुळे काय मिळते हे सांगताना डॉ. कुंभार यांनी तीन W आणि दोन H हा formula सांगितला. वाचनातून Knowledge म्हणजे ज्ञान मिळाल्यावर तुम्हाला तीन W म्हणजे Wisdom, Work, Wealth (विद्वत्ता, काम आणि पैसा), आणि दोन H म्हणजे Health (Physical Health and Mental Health), Happiness (आनंद) या गोष्टी मिळतात.

वाचनासाठी वेळ कुठून काढायचा यावर बोलताना डॉ. कुंभार म्हणाले, सुरुवातीला फक्त अर्धा तास वेळ काढा. एकदा वाचनाची आवड निर्माण झाली की नंतर वेळ काढावा लागत नाही तर माणूस आपोआप वाचनाकडे ओढला जातो. उलट वाचनातून इतर गोष्टी करण्यासाठी वेळ काढावा लागेल. सुरुवातीला वेळ काढण्यासाठी मोबाईल मध्ये जो अनावश्यक वेळ जातो त्यातून वेळ काढण्याचा सल्ला त्यांनी दिला. शिवाय वाचन करत असताना इतर कोणत्याही social media पासून दूर रहा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. कुंभार यांच्याकडून श्रोत्यांना वाचनातून व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. पण यानंतरही श्रोत्यांना पडलेल्या प्रश्नांना व शंकांना सरांनी उत्तरे दिली. त्यामध्ये फक्त सार/सारांश (abstract) वाचून पुस्तकात काय दिले आहे ते जर आम्हाला कळते तर संपूर्ण पुस्तक का वाचायचे? यावर उत्तर देताना डॉ. कुंभार म्हणाले, जेवण जेवताना आपण एक घास खाऊन थांबत नाही. संपूर्ण जेवण केल्यावरच पोट भरते. तसेच सारांश वाचून होते. सारांश वाचनातून मूळ पुस्तक वाचण्याची उर्मी जागृत होऊन मूळ संपूर्ण पुस्तकच वाचले पाहिजे.

अवांतर वाचन करायचे आहे पण कोणत्या पुस्तकापासून अवांतर वाचनाची सुरुवात करावी? या प्रश्नाला उत्तर देताना मराठी पुस्तकांबरोबरच You Can Win, 5 am Club, 7 Habits of Highly Effective People, How to Win Friends and Influence People अशी काही इंग्रजी भाषेतील प्रेरणा देणारी (motivational) पुस्तके वाचा असे त्यांनी सांगितले. वाचनाला सुरुवात केली की आपोआप आपल्याला आपली आवड कोणते साहित्य प्रकार वाचण्याची आहे ते कळते. वाचन झाल्यावर मला आजच्या वाचनातून काय मिळाले किंवा काय समजले हे लिहिण्याची सवय लावा असेही डॉ. कुंभार यांनी यावेळी श्रोत्यांना सांगितले. कुंभार सरांचे विचार ऐकल्यानंतर सगळे श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

त्यानंतर अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे म्हणाल्या, मुलांना लहानपणापासूनच वाचनाची सवय लावण्याची जबाबदारी पालकांची आहे. अशी सवय असलेल्या मुलांना त्यांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह एखाद्या ऐवजाप्रमाणे वाटतो. मुलांना बक्षीस म्हणून किंवा एखाद्या गोष्टीचे कौतुक म्हणून लहानपणापासूनच पुस्तके भेट म्हणून द्यावीत असेही त्यांनी आपल्या भाषणातून सुचविले.

कार्यक्रमाच्या शेवटी जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सहाय्यक ग्रंथपाल डॉ. प्रियांका वाडेकर यांनी मंत्रमुग्ध व्याख्यानाबद्दल व्याख्याते डॉ. राजेंद्र कुंभार यांचे, अध्यक्षस्थान भूषविल्याबद्दल डॉ. ज्योती भाकरे यांचे, कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिल्याबद्दल डॉ. रवींद्र शिंगणापूरकर यांचे, कार्यशाळेचे आयोजक डॉ. संजय देसले यांचे, उपस्थित विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

वाचन कौशल्य कार्यशाळा या कार्यक्रमाची काही छायाचित्रे :








# सामूहिक वाचन

“व्यक्तिमत्व विकासासाठी वाचा तुमचे आवडीचे पुस्तक”

दि. ०२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४.०० ते ५.३०

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमांतर्गत दि. ०२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४.०० ते ५.३० या वेळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने **‘एक तास सामूहिक वाचन’** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, प्रशाला संचालक, विभागप्रमुख, अध्यासनप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यासाठी माहितीप्रीत्यर्थ एक परिपत्रक काढून ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले. वरील सर्वांना या परिपत्रकाद्वारे **“व्यक्तिमत्व विकासासाठी वाचा तुमचे आवडीचे पुस्तक”** या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन दि. ०२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४.०० ते ५.३० या वेळेत वाचन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरु मा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव मा. डॉ. ज्योती भाकरे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, यामध्ये मा. डॉ. रविंद्र शिंगणापूरकर, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य यामध्ये मा. मुकुंद पांडे, विविध प्रशाला संचालक, विभागप्रमुख, अध्यासनप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी आणि सुमारे २४५ विद्यार्थी यांनी सहभाग घेऊन १ तास वाचन केले. यात सहभाग घेतलेल्या काही वाचकांनी स्वतःची पुस्तके आणून त्यांचे वाचन केले. तर ज्या वाचकांनी स्वत:चे पुस्तक आणले नव्हते त्या वाचकांना जयकर ज्ञानस्रोत केंद्राने एक तास वाचण्यासाठी पुस्तके उपलब्ध करून दिली. या सर्वांनी एक तास हिरवळीवर बसून वाचनाचा आनंद घेतला.

यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्राने ५ Book-Stall लावून प्रत्येक Stall वर निरनिराळ्या विषयांवरील गाजलेली सुमारे १०० पुस्तके अशी एकूण ५०० पुस्तके ठेवली होती. वाचकांनी त्यातील २६० हून अधिक पुस्तके त्यांच्या आवडीप्रमाणे वाचनासाठी निवडली.

वाचकांनी वाचावयास घेतलेल्या पुस्तकांची जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या सर्व तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी यांनी रीतसर नोंद करून घेतली. या माहितीचा उपयोग वाचकांचा सध्याचा वाचनकल काय आहे याचा अभ्यास करण्यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे केला जाईल.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन व आखणी जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्र-संचालक डॉ. संजय देसले, सर्व सहाय्यक ग्रंथपाल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व तांत्रिक सहाय्यक, ग्रंथालय प्रशिक्षणार्थी आणि इतर कार्यालयीन सेवकांनी कष्ट घेतले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमागील हिरवळीवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रस्तुत कार्यक्रम पार पडल्यानंतर अनेक नवीन वाचकांनी ग्रंथालयाच्या सभासदत्वासाठी अर्ज केल्याचे लक्षात आले. तसेच अगोदरच सभासद असलेल्या शिक्षकेतर वाचकांनी पुन्हा वाचण्यास सुरुवात केली. सामूहिक वाचन कार्यक्रमाच्या वेळी हिरवळीवर वाचावयास घेतलेले पुस्तक अनेक वाचक दुसऱ्या दिवशी जयकर ज्ञानस्रोत केंद्रातून स्वतःच्या नावावर नोंद करून वाचावयास घेऊन गेले. एकूणच या कार्यक्रमाचे आयोजन ज्या हेतूने केले गेले तो हेतू काही प्रमाणात साध्य झाल्याचे दिसून आले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# जयकर ज्ञानस्रोत केंद्र

# सामूहिक वाचन कार्यक्रम पत्रिका

### दि. ०२ जानेवारी २०२५ वेळ दुपारी ४.०० ते ५.३०

दु. ३.३० : मुख्य इमारती मागील हिरवळीवर कार्यक्रमाची पूर्वतयारी

दु ४.०० : कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, अधिकार मंडळाचे सदस्य यांचे आगमन

दु ४.०० ते ४.१० : कुलगुरूंचे उपस्थितांना संबोधन

दु ४.१० ते ५.१० : एक तास सामूहिक वाचन उपक्रम

दु. ५.१० ते ५.३०: चहा-पान कार्यक्रम

## सामूहिक वाचन कार्यक्रमाची काही छायाचित्रे :













# वाचन संवाद (वाचक - लेखक परिसंवाद)

## व्याख्याते : डॉ. सदानंद मोरे

## विषय : महाराष्ट्राची वाचन संस्कृती

“लेखक आपल्या भेटीला” या कार्यक्रमाच्या निमित्ताने दि. ०४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता संत साहित्याचे अभ्यासक, लेखक, तसेच पंजाब मधील घुमान येथे २०१५ साली पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविलेले डॉ. सदानंद मोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. सदानंद मोरे यांनी ‘महाराष्ट्रातील वाचन संस्कृती तसेच वाचनाचे महत्व’ या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. श्रवणसंस्कृतीपासून ते वाचनसंस्कृतीपर्यंतचा प्रवास त्यांनी या व्याख्यानाद्वारे उलगडला.

छापील ग्रंथ प्रकाशनाच्या निर्मिती आणि प्रसाराच्या महाराष्ट्रातील प्रवासाविषयी सांगतांना ‘बाळशास्त्री जांभेकर’ यांनी पहिला मराठी ग्रंथ “ज्ञानेश्वरी” छापला. ‘निर्णय सागर’ यांनी पहिले छापील “पंचांग” काढले. अशाप्रकारे धार्मिक ग्रंथ व पंचांग यांनी पुस्तक प्रकाशनाची सुरुवात झाली. त्यानंतर लोकहितवादी आणि गोपाळ गणेश आगरकर यांनी पुण्यातील पहिल्या सार्वजनिक वाचनालयाची स्थापना केली, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रे आणि दिवाळी अंक यांचा महाराष्ट्रातील वाचनात समावेश झाला. अशा प्रकारे वाचनसंस्कृती सर्वसामान्यापर्यंत पोहचायला लागली. समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी ती समाजातील स्त्रिया व अन्य घटकांपर्यंत पोहचली. अशा प्रकारे भूर्जपत्रे, ताम्रपट, छापील पुस्तक ते ई-बुक्स पर्यंतचा आढावा डॉ. मोरे यांनी आपल्या व्याख्यानातून घेतला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रजनी मेश्राम यांनी केले. लेखकाचा परीचय मराठी विभागातील प्रा. डॉ. उमेश शिरसाट यांनी केला. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. संजय देसले यांनी भूषविले. माहितीचा विस्फोट झाल्यामुळे तसेच माहिती विविध मार्गांद्वारे उपलब्ध होत असल्यामुळे ग्रंथालयांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविली असे चित्र दिसते. चांगल्या व परीपूर्ण माहितीसाठी

ग्रंथालय कसे उपयुक्त आहे याची माहिती डॉ. संजय देसले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सौ. शुभांगी मुंडलिक यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विभागांतील विद्यार्थी, संशोधक वाचक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व सेवक यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

**वाचन संवाद (वाचक-लेखक परिसंवाद) डॉ. सदानंद मोरे या उपक्रमाची छायाचित्रे :**











# “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” अंतर्गत लेखक आपल्या भेटीला

## डॉ. राजीव बर्वे

## विषय : वाचन संस्कृती आणि प्रकाशन विश्व

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या कार्यक्रमाच्या निमित्ताने दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखक, प्रकाशक डॉ. राजीव बर्वे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. राजीव बर्वे यांनी “वाचन संस्कृती आणि प्रकाशन विश्व” या विषयावर व्याख्यान देऊन “वाचनाचे महत्व तसेच पुस्तक प्रकाशन विश्वातील घडामोडी” या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. मुद्रित पुस्तक प्रकाशन व्यवसायावर वेळोवेळी टेलिव्हिजन, व्हिडीओ कॅसेट रेकॉर्डर, ई-बुक्स, कोरोना अशी संकटे येऊनही प्रकाशन व्यवसाय त्यातूनही तरुन गेला. पुणे पुस्तक महोत्सव, वाचन संकल्प महाराष्ट्राचा अशा कार्यक्रमांमुळे आजकाल या व्यवसायाला चांगले दिवस आले असल्याचे त्यांच्या व्याख्यानात त्यांनी नमूद केले. नवीन पिढीने करियर म्हणून प्रकाशन व्यवसायाचा विचार करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व लेखक परिचय डॉ. रजनी मेश्राम यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. संजय देसले यांनी भूषविले. आपल्या देशात रिसर्च जर्नल प्रकाशन याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे संशोधकांना त्यांचे संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियतकालिक प्रकाशकांचा आधार घ्यावा लागतो. मराठी प्रकाशकांनी याकडे गांभीर्याने पाहण्याची आणि रिसर्च जर्नल प्रकाशन यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे असे मत अध्यक्षीय भाषणात डॉ. संजय देसले यांनी मांडले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. प्रियांका वाडेकर यांनी केले. या व्याख्यानाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विभागातील विद्यार्थी, संशोधक वाचक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व सेवकवर्ग, उपस्थित होते. उपस्थित सर्व श्रोत्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

**वाचन संवाद (वाचक - लेखक परिसंवाद) या उपक्रमाची काही छायाचित्रे :**






## “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” अंतर्गत लेखक आपल्या भेटीला

### अंजली कुलकर्णी विषय : माझा लेखन प्रवास

### दि. ०७/०१/२०२५

दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमांतर्गत लेखिका व कवयित्री अंजली कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी “माझा लेखन प्रवास” या विषयावर त्यांनी केलेले वाचन व त्यातून नकळत निर्माण झालेली कवयित्री याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लेखकाच्या लेखन प्रवासात त्याचे स्वतःचे वाचन आणि सामाजिक भान यांचे योगदान मोलाचे ठरते. स्त्रियांसाठी केलेले सामाजिक कार्य हे त्यांच्या स्त्रीवादी लेखाणाची प्रेरणा असल्याचे लेखिका अंजली कुलकर्णी यांनी त्यांच्या व्याख्यानात नमूद केले. तसेच त्यांच्या काव्यसंग्रहातील काही कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील वृषाली खिलारी यांनी केले. व्याख्यात्यांचा परिचय डॉ. प्रियांका वाडेकर यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. नागेश लोंढे यांनी भूषविले.

“स्त्रीवादी असणाऱ्या कवयित्री तुम्ही
तुमच्या कवितेच्या प्रेमात थक्क आम्ही”

असे रविशा मनोहर देशमुख या ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनीने पत्राद्वारे आपले विचार व्यक्त केले. या व्याख्यानाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विभागातील विद्यार्थी, संशोधक वाचक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील सर्व सेवकवर्ग, उपस्थित होते. उपस्थित सर्व श्रोत्यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

**वाचन संवाद (वाचक - लेखक परिसंवाद)या उपक्रमाची काही छायाचित्रे :**









# कथा-कथन स्पर्धा

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमांतर्गत बुधवार दि. ०८ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे कथा-कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमाच्या सुरुवातीपासूनच प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी तोंडी सांगून तसेच छापील फलक आणि सूचना या मध्यमांमधून विद्यार्थ्यांना सहभाग घेण्याचे आवाहन केले होते.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून भाषा विभागांतील विभागप्रमुखांनी कामकाज पहावे अशी सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली होती. त्या सूचनेस अनुसरून विद्यापीठातील पाच विभागप्रमुखांना गुरुवार दि. ०२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले. सदर बैठकीत उपस्थित भाषा विभागप्रमुख आणि जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले यांनी स्पर्धेचे नियम आणि अटी काय असाव्यात हे ठरविले. त्याप्रमाणे स्पर्धेचे नियम व अटी विद्यार्थ्यांना कळविण्यात आल्या.

स्पर्धेचे नियम व अटी :

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा” या उपक्रमाअंतर्गत दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. दुपारी ३ ते ५ यावेळेत वरील स्पर्धा जयकर ज्ञानस्रोत केंद्रात घेण्यात येणार आहेत.

१) कथा स्वलिखित किंवा इतर लेखकाची असावी. त्या कथेची लिखित/ मुद्रित संहिता आवश्यक आहे.

२) कथाकथन सादर करण्यासाठी वेळेची मर्यादा ८-१० मिनिटे असेल.

३) कथाकथन सादर करतेवेळी कथेची छापील किंवा हस्तलिखित छायाकिंत प्रत परीक्षकाकडे जमा करावी लागेल.

४) कथा इंग्रजी/ हिंदी/ मराठी यां भाषेमधील असावी.

५) कथेसाठी विषयाचे बंधन नाही, पण ती राजकीय, सामाजिक व जातीय सलोखा बिघडवणारी नसावी.

६) स्पर्धकांनी आपले नाव जयकर ज्ञानस्रोत केंद्र येथे डॉ. प्रियांका वाडेकर (नियतकालिक विभाग) यांच्याकडे नोंदवावे.

७) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

८) कथा-कथन स्पर्धेसाठी नाव पाठवण्याचा अंतिम दिनांक ७ जानेवारी २०२५ असेल.

९) पहिल्या ३ विजेत्यांना बक्षीस देण्यात येईल.

१०) कथा-कथन स्पर्धेचा निकाल २६ जानेवारी २०२५ रोजी जाहीर करण्यात येईल.

**या स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांची नावे व इतर माहिती :**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोर्स | विभाग |
|---|---|---|---|
| १. | सतीश दिलीप जोंधळे<br>Satish DilipJondhale | M.Sc. | संगणक शास्त्र विभाग<br>Dept. of Computer Science |
| २. | स्वप्नील अशोक बहीर<br>Swapnil AsokBahir | M.A. | अर्थशास्त्र विभाग<br>Dept. of Economics |
| ३. | शुभम सुभाष फरताडे<br>Shubham SubhashFartade | M.A. | अर्थशास्त्र विभाग<br>Dept. of Economics |
| ४. | निशिता सुधीर पेंढारकर<br>Nishita SudhirPendharkar | M.Sc. | गणित विभाग<br>Dept. of Mathematics |
| ५. | जान्हवी रवींद्र निंबर्ते<br>Janhvi RavindraNimbarte | M.A. | Dept. of English<br>इंग्रजी विभाग |
| ६. | दिव्या गणेश थोरात<br>Divya Ganesh Thorat | M.Sc. | गणित विभाग<br>Dept. of Mathematics |
| ७. | शुभांगी शिवाजी बाबर<br>Shubhangi ShivajiBabar | L.L.M. | विधी विभाग<br>Dept. of Law |
| ८. | सिमांतिनी संजय निगडे<br>Simantinee SanjayNigade | L.L.M. | विधी विभाग<br>Dept. of Law |
| ९. | पुरुषोत्तम उपर्वत<br>PurushottamUparvat | M.A. | पाली आणि बौद्ध अभ्यास विभाग<br>Dept. of Paliand Buddhist Studies |
| १०. | संजय मोरे<br>SanjayMore | M.A. | पाली आणि बौद्ध अभ्यास विभाग<br>Dept. of Paliand Buddhist Studies |
| ११. | मनोज बाळू होले<br>Manoj BaluHole | M.A.-I | शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभाग<br>Dept. of Education & Extention |

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून भाषा विभागांतील विभागप्रमुखांनी कामकाज पाहिले. त्यामध्ये हिंदी भाषा विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले, मराठी भाषा विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे, संस्कृत आणि प्राकृत भाषा विभागप्रमुख डॉ. दिवाकर मोहंती यांचा समावेश होता.

स्पर्धा पार पडल्यानंतर लगेचच परीक्षकांनी सहभागी स्पर्धकांना गुण दिले. स्पर्धकांना मिळालेल्या गुणांनुसार त्याच दिवशी परीक्षकांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढून बंद लिफाफ्यामध्ये निकाल संचालक डॉ. संजय देसले यांच्याकडे सुपूर्त केला.

**या स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांची नावे व त्यांना मिळणाऱ्या बक्षिसांचा तपशील :**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक | बक्षीसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | शुभम सुभाष फरताडे<br>Shubham SubhashFartade | प्रथम | रु. ५०००/- रोख आणि प्रमाणपत्र |
| २. | निशिता सुधीर पेंढारकर<br>Nishita SudhirPendharkar | द्वितीय | रु. ३०००/- रोख आणि प्रमाणपत्र |
| ३. | शुभांगी शिवाजी बाबर<br>Shubhangi ShivajiBabar | तृतीय | रु. २०००/- रोख आणि प्रमाणपत्र |

उर्वरित सर्व सहभागी विद्यार्थ्यांना जयकर ज्ञानस्रोत केंद्रामधून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल. पारितोषिके मिळालेल्या विजयी विद्यार्थ्यांची नावे २६ जानेवारी रोजी पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मा. कुलगुरुंनी जाहीर केली. या विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या समारंभात दु. २.०० ते ६.०० या वेळेत जयकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे घेण्यात आला.

**कथा-कथन स्पर्धेची काही छायाचित्रे :**





# पुस्तक परीक्षण स्पर्धा

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या सृजनशीलतेत वाढ व्हावी, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वेळ पुस्तकांसोबत घालवावा यासाठी या अभियानांतर्गत जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राने दि. ०१ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन केले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांतील पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी तसेच संशोधक विद्यार्थी अशा सर्व वाचकांनी पुस्तक परीक्षण स्पर्धेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. या स्पर्धेत एकूण ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षणासाठी सविस्तर नियमावलीचा वापर करून मराठी, इंग्रजी तसेच हिंदी भाषेतील विविध पुस्तकांचे परीक्षण करून स्वलिखित परीक्षणे व पीडीएफ फाईल जयकर ज्ञानस्त्रोत केंद्रात जमा केले. काही विद्यार्थांनी पुस्तक परीक्षणची हस्तलिखित प्रत जयकर ज्ञानस्रोत केंद्रात जमा केली होती. अशा विद्यार्थांची परीक्षणे ग्रंथालय प्रशिक्षणार्थींनी MS-Word मध्ये टाइप करून पुस्तक परीक्षण पोर्टल वर अपलोड केली.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून भाषा विभागांतील विभागप्रमुखांनी कामकाज पाहिले. त्यामध्ये हिंदी भाषा विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले, मराठी भाषा विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे, इंग्रजी भाषा विभागप्रमुख डॉ. चंद्राणी चटर्जी यांचा समावेश होता. त्यांनी पुस्तक परीक्षण स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थांमधून पहिला, दुसरा, व तिसरा असे क्रमांक काढले. त्यात मराठी भाषेतील पुस्तक परीक्षण' यातून तीन क्रमांक आणि इंग्रजी भाषेतील पुस्तक परीक्षण' यातून तीन क्रमांक काढण्यात आले.

पारितोषिके मिळालेल्या विजयी विद्यार्थ्यांची नावे २६ जानेवारी रोजी पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मा. कुलगुरुंनी जाहीर केली. या विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या समारंभात दु. २.०० ते ६.०० या वेळेत जयकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे घेण्यात आला.

बक्षीसपात्र विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

| **पुस्तक परीक्षण स्पर्धा (मराठी भाषेतील परीक्षणे)** | **क्रमांक** | **रक्कम रु.** |
|---|---|---|
| सतीश दिलीप जोंधळे | प्रथम | ५०००/- |
| राहुल ससाणे | द्वितीय | ३०००/- |
| अल्फिया जावेद पठाण | तृतीय | २०००/- |
| **पुस्तक परीक्षण स्पर्धा (इंग्रजी भाषेतील परीक्षणे)** | | |
| स्रिस्टी | प्रथम | ५०००/- |
| जितमित्र कुलकर्णी | द्वितीय | ३०००/- |
| जान्हवी रविंद्र निंबार्ते | तृतीय | २०००/- |

उर्वरित सर्व सहभागी विद्यार्थ्यांना जयकर ज्ञानस्रोत केंद्रामधून प्रोत्साहनपर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल.

# पारितोषिक वितरण समारंभ

## दि. ११/०२/२०२५ दुपारी २.०० ते सायं ६.००

“वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ या उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या ‘कथा-कथन स्पर्धा’ आणि ‘पुस्तक परीक्षण स्पर्धा’ या दोन्ही स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविलेल्या विद्यार्थ्यांची नावे २६ जानेवारी रोजी पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मा. कुलगुरुंनी जाहीर केली. या विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या समारंभात दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी दु. २.०० ते ६.०० या वेळेत हा पारितोषिके वितरणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी विजेत्यांची नावे या दोन्ही स्पर्धांच्या परीक्षक समीतीमधील हिंदी विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले यांनी पुकारली. या प्रसंगी व्यासपीठावर मा. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, मा. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले, हिंदी विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले, क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके, यांच्यासह विद्यापीठातील अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये मा. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि मा. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना बक्षीसाची रोख रक्कम आणि प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कथा-कथन स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या ११ विद्यार्थ्यांपैकी तीन विजेते परीक्षकांनी निवडले.

**कथा-कथन स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांची नावे व त्यांना मिळालेल्या बक्षिसांचा तपशील :**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक | बक्षीसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | शुभम सुभाष फरताडे<br>Shubham Subhash Fartade | प्रथम | रु. ५०००/- रोख आणि प्रमाणपत्र |
| २. | निशिता सुधीर पेंढारकर<br>Nishita Sudhir Pendharkar | द्वितीय | रु. ३०००/- रोख आणि प्रमाणपत्र |
| ३. | शुभांगी शिवाजी बाबर<br>Shubhangi Shivaji Babar | तृतीय | रु. २०००/- रोख आणि प्रमाणपत्र |

पुस्तक परीक्षण स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या ७६ विद्यार्थ्यांपैकी मराठी भाषेतून पुस्तक परीक्षण लिहिलेल्या ३ आणि इंग्रजी भाषेतून पुस्तक परीक्षण लिहिलेल्या ३ अशा एकूण ६ विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

**पुस्तक परीक्षण स्पर्धेमधील विजेत्या स्पर्धकांची नावे व त्यांना मिळालेल्या बक्षिसांचा तपशील :**

| अ.क्र. | पुस्तक परीक्षण स्पर्धा (मराठी भाषेतील परीक्षणे) | क्रमांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | सतीश दिलीप जोंधळे<br>Sateesh Dilip Jondhale | प्रथम | ५०००/- |
| २. | राहुल ससाणे<br>Rahul Sasane | द्वितीय | ३०००/- |
| ३. | अल्फिया जावेद पठाण<br>Alfiya Javed Pathan | तृतीय | २०००/- |
| **अ.क्र.** | **पुस्तक परीक्षण स्पर्धा (इंग्रजी भाषेतील परीक्षणे)** | **क्रमांक** | **रक्कम रु.** |
| १. | स्रिस्टी<br>Sristy | प्रथम | ५०००/- |
| २. | जितमित्र कुलकर्णी<br>Jitmitr Kulkarni | द्वितीय | ३०००/- |
| ३. | जान्हवी रविंद्र निंबार्ते<br>Janhavi Ravindr Nimbarte | तृतीय | २०००/- |

कथा-कथन स्पर्धेचे नियोजन जयकर ग्रंथालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल डॉ. प्रियंका वाडेकर यांनी तर पुस्तक परीक्षण स्पर्धेचे नियोजन जयकर ग्रंथालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल डॉ. रजनी मेश्राम यांनी केले. जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनानुसार या दोन्ही स्पर्धांचे नियोजन आणि पारितोषिक वितरण यांचे संयोजन जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वृषाली खिलारी आणि शुभांगी मुंडलिक यांनी केले.

## पारितोषिक वितरण समारंभाची काही छायाचित्रे :







७६व्या वर्धापन दिनानिमित्त
सांस्कृतिक कार्यक्रम
प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
७६व्या वर्धापन दिनानिमित्त
सांस्कृतिक कार्यक्रम


सांस्कृतिक कार्यक्रम
प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी
कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
७८व्या वर्धापन दिनानिमित्त
सांस्कृतिक कार्यक्रम
प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी
कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# पुस्तक परीक्षण स्पर्धा
# आणि
# कथा-कथन स्पर्धा

# पारितोषिक प्राप्त
# पुस्तक परीक्षणे आणि कथा

## मराठी पुस्तक परीक्षण प्रथम क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : सतीश दिलीप जोंधळे
विभाग : Computer Science MCA - प्रथम वर्ष
पुस्तकाचे शीर्षक : गोदान
लेखक : प्रेमचंद
सरस्वती प्रेस, बनारस, १९५४, पृष्ठे-३६४.
ISBN : 8186311823

## "गोदान" भारतीय जीवनाचे प्रतिबिंब असलेली महान कादंबरी

**गोदान - नावाचा अर्थ व त्याचे महत्व :** 'गोदान' या कादंबरीचे नावच तिच्या गाभ्याचा अर्थ स्पष्ट करते. गोदान म्हणजे गायीचे दान, जे हिंदू धर्मात धार्मिक आणि अध्यात्मिक महत्वाचे मानले जाते. ही प्रथा मृत्यूपूर्वी मोक्ष प्राप्तीच्या श्रद्धेसाठी केली जाते. कादंबरीतील मुख्य पात्र होरीच्या जीवनातील गोदानाचा प्रसंग त्याच्या दुःखद जीवनाचे आणि आत्मीयतेचे प्रतीक आहे.

**वाचकांवर होणारा प्रभाव :** 'गोदान वाचताना वाचक होरी महतोच्या साध्या, संघर्षपूर्ण जीवनाशी जोडला जातो. त्याची प्रामाणिकता, त्याच्या स्वप्नांची राख आणि सामाजिक अन्याय वाचकाला अंतःकरणातून हलवतो. कादंबरीचा शेवट, होरीच्या मृत्यूने, वाचकाला विचार करायला भाग पाडतो. होरीच्या जीवनाचा शेवट पाहून वाचकाच्या डोळ्यात अश्रू दाटतात, जणू त्याच्याशी आपली नाळ जुळल्याचा अनुभव येतो. वाचकाच्या डोळ्यातून वाहणारा तो अश्रूच कथेचा खरा पूर्णविराम ठरतो. गोदान फक्त कथा नसून, मानवी भावनांचा एक आरसा आहे, जो समाजातील अन्याय, दुःख आणि संघर्षाचे प्रतिबिंब वाचकाच्या मनावर कोरतो.

**गोदान कादंबरीची बलस्थाने :** शेती, शेतकऱ्यांचे जीवन, सामाजिक विषमता, प्रामाणिक पात्रे, वास्तववादी कथा, ग्रामीण भारताचे सजीव चित्रण, नैतिकता, तत्त्वज्ञान आणि मानवी संघर्ष.

**कादंबरीची कमजोरी :** शहरी पात्रांवर कमी लक्ष, काही प्रसंगांतील दीर्घ वर्णन, मध्यवर्ती गोष्टीचे पुनरावर्तन, आणि काही ठिकाणी कथानकाचा मंद वेग.

**मुख्य पात्रे :**

१. होरी महतो : हा कादंबरीचा मुख्य नायक आहे, जो एक साधा आणि गरीब शेतकरी आहे. तो प्रामाणिक आहे आणि कुटुंबासाठी स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक सुखाचा त्याग करतो. समाजातील अन्याय सहन करताना तो आपले कर्तव्य निभावत राहतो.

२. धनिया : होरीची पत्नी, जी खंबीर आणि समर्पित आहे. ती परिवाराच्या समस्यांशी लढा देते आणि होरीचे मानसिक आधारस्तंभ आहे. तिला तिच्या बळकट स्वभावामुळे ग्रामीण महिलांचे प्रतीक मानले जाते.

3. झनिया : समाजाला न जुमानता, ती तिच्या प्रियकरासाठी आणि मुलासाठी संघर्ष करते. तिचे पात्र समाजातील बदल आणि महिलांच्या स्वातंत्र्याचे प्रतिनिधित्व करते.

4. गोबर : होरीचा मुलगा, जो आपल्या वडिलांच्या विचारसरणीला आव्हान देतो. त्याचे पात्र नव्या पिढीचे विचार आणि ग्रामीण-शहरी ताणतणाव दाखवते.

**कादंबरीचा मुख्य विषय :** 'ग़ोदान' ही हिंदी साहित्याच्या इतिहासातील एक अमर कादंबरी आहे. जी प्रेमचंद यांची अखेरची आणि सर्वाधिक परिपक्व साहित्यकृती आहे. प्रेमचंद याना "हिंदी कादंबरीचा सम्राट" म्हणून ओळखलं जातं, आणि गोदान ही त्यांच्या लेखनाची सामाजिक, भावनिक, आणि साहित्यिक परिपक्वतेची उत्कृष्ट ओळख आहे. मी ही कादंबरी निवडण्याचं कारण म्हणजे तिचं असामान्य साहित्यिक आणि सामाजिक मूल्य. गोदान फक्त एक कथा नाही; ती भारतीय जीवनाचे दर्शन घडवणारा एक आरसा आहे. हे प्रेमचंद यांचे साहित्यिक जीवनातील सार असल्याने, त्यांच्या विचारसरणी, समाजाभिमुखता, आणि लेखनातील परिपक्कतेला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी ही कादंबरी सर्वोत्तम आहे.

**गोदान - भारतीय जीवनाचे बहुमुखी प्रतिबिंब :**

- ग्रामीण शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, सावकारांकडून शोषण, जमीनदारांचा फडशा, गरिबीचे चक्र

- शेतकऱ्यांचे संघर्ष, कठीण कृषी जीवन, कर आणि कर्जाचा बोजा, गरीबीतही असलेली आत्मसन्मानाची भावना, शिक्षणाचा अभाव, शेतकऱ्यांचे स्थलांतराचे प्रश्न, ग्रामीण-शहरी दरी, शहरी जीवनाचे आभासी आकर्षण, नवीन समस्यांची साखळी, शहरीकरणाचा प्रभाव.
- महिलांचे मानसशास्त्र, धनियाची ताकद आणि खंबीरता, झुनियाचा समाजाच्या विरोधातील संघर्ष, कुटुंब आणि समाजातील महिलांची भूमिका
- भारतीय संस्कृती, परंपरा आणि विधी (उदा. गोदान), जातीव्यवस्थेचा प्रभाव, अध्यात्मिक आणि सामाजिक श्रद्धा
- सामाजिक विषमता, आर्थिक अंतर, जातीय संघर्ष, ग्रामीण आणि शहरी जीवनातील तफावत
- परंपरा विरुद्ध आधुनिकता, जुन्या परंपरांची जपणूक, बदलत्या आधुनिकतेतील संघर्ष

गोदान ही कथा एक गरीब शेतकरी होरी महतोच्या आयुष्याभोवती फिरते. होरी एक साधा आणि प्रामाणिक शेतकरी आहे, जो आपले छोटेसे कुटुंब चालवण्यासाठी कठोर परिश्रम करतो. त्याचे स्वप्न म्हणजे एक गाय खरेदी करणे, ज्यामुळे त्याचे कुटुंब आर्थिक आणि धार्मिक दृष्टीकोनातून समाधानी होईल. होरीची पत्नी धनिया, त्याचा मुलगा गोबर आणि झुनिया या कुटुंबातील सदस्यांमुळे कथेचे वेगवेगळे पैलू उलगडतात. गोबर, जो आपल्या वडिलांच्या जुन्या परंपरांना नाकारतो, झुनियाला घेऊन गाव सोडतो. त्याच्या या वागणुकीमुळे कुटुंबावर सामाजिक कलंक येतो, ज्याचा सामना होरी आणि धनियाला करावा लागतो. कथेत होरी शोषणाचा बळी ठरतो. सावकार, जमीनदार, आणि समाजाच्या अन्यायकारक व्यवस्था त्याला सतत त्रास देतात. कर्जबाजारीपणामुळे त्याचा जमिनीवरचा हक्क गमावतो, पण त्याची संघर्षशील वृत्ती कायम राहते. शेवटी, कर्जाच्या ओझ्याखाली तो आपल्या आयुष्याची आहुती देतो. होरीच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या पत्नीने धार्मिक कृत्य म्हणून गाय दान करायची तयारी दाखवली. पण त्यासाठीही पैसे नसल्याने एक मातीची गाय दान केली जाते. या प्रसंगाने भारतीय शेतकऱ्यांच्या दुःखद जीवनाचे सत्य उलगडते.

# मराठी पुस्तक परीक्षण द्‌वितीय क्रमांक



विद्‌यार्थ्याचे नाव : राहुल बबन ससाणे
विभाग : मराठी Ph.D. संशोधक विद्‌यार्थी : वर्ष सहावे
पुस्तकाचे शीर्षक : भक्ती आणि धम्म
लेखक : रावसाहेब कसबे
लोकवाड्‌मय गृह, मुंबई, पृष्ठे : ६६४.
ISBN : 9789382789789

एखादा लेखक जेव्हा एखादी कलाकृती निर्माण करतो, त्या कलाकृतीची निर्मिती प्रक्रिया व प्रेरणा कोणत्या होत्या, ते तो सांगत असतो अथवा वाचक आपल्या वाचनामधून, आकलनामधून त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत असतात. म्हणूनच साहित्य व्यवहारात पुस्तक परिक्षण या घटकाला विशेष असे महत्त्व आहे. आधुनिक महाराष्ट्रातील वैचारिक साहित्याची खूप मोठी परंपरा आपल्याकडे आहे. यामधील एक महत्त्वाचे नाव म्हणजे डॉ. रावसाहेब कसबे होय. प्रामुख्याने मानव आणि धर्म व त्यांचा परस्परसंबंध याचा शोध घेण्याचा प्रयत्न ते आपल्या साहित्यातून करताना दिसून येतात. त्यांचे झोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, आंबेडकर आणि मार्क्स, हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद, मानव आणि धर्मचिंतन, धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवास आणि भक्ती आणि धम्म इ. ग्रंथ प्रकाशित आहेत.

मानव त्याची उत्पत्ती व निसर्ग याचा संबंध कसा आहे? मानवची निर्मिती नैसर्गिक पद्‌धतीने झाली की त्याला कुठल्या परमेश्वराने, देवाने निर्माण केले? विश्व निर्मिती विषयक विज्ञान व वैज्ञानिकांची भूमिका इ. प्रश्नांवर भाष्य करण्याचे काम त्यांचा हा भक्त आणि धम्म करतो. प्रामुख्याने त्यांच्या साहित्याचा जेव्हा आपण सखोल अभ्यास करतो तेव्हा एक सूत्र आपल्याला सापडते आणि ते म्हणजे त्यांची चिकित्सक दृष्टी होय. मानव आणि धर्मचिंतन, धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवास आणि भक्ती आणि धम्म या तीन ग्रंथांची एक मालिका आहे. वाचकांना

भक्ती आणि धम्म हा ग्रंथ जर समजून घ्यायचा असेल तर त्यांना आधी वरील दोन ग्रंथ वाचणे अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचे आहे. कारण या तीन ग्रंथांमधून त्यांनी आपले विवेचन मांडलेले आहे.

प्रामुख्याने भक्ती आणि धम्म हा ग्रंथ एकूण तीन भागांमध्ये विभागलेला आहे.

विभाग पहिला- भक्ती या नावाने आहे. या अंतर्गत धर्म आणि देव, प्रेम आणि भक्ती असे तीन घटकांच्या आधारे विशेषण केलेले आहे. त्यानंतर दुसऱ्या विभागामध्ये पुनरूज्जीवन आणि प्रबोधन या शीर्षकाखाली पुनरूज्जीवन आणि प्रबोधनाचे स्वरूप, प्रबोधनकालीन राजकीय विचारांचा विकास, भारतीय पुनरूज्जीवन आणि प्रबोधन या घटनांचा समावेश आहे. आणि शेवटच्या तिसऱ्या विभागात धम्म या शीर्षकाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय प्रबोधन चळवळीचे साफल्य, बुद्‌ध धम्माचा उदय आणि विकास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बुद्‌ध आणि धम्म या घटनांच्या संदर्भात सखोल अशी चिकित्सक मांडणी केलेली आहे.

या ग्रंथांचे एक वैशिष्ट्य असे आहे की कसबे यांनी आपली मांडणी करत असताना साधारपणे शंभरच्या वर इंग्रजी संदर्भग्रंथांचा उपयोग केला आहे. तसेच हिंदी मधील दहा आणि मराठीमधील वीसच्या आसपास ग्रंथ संदर्भ म्हणून वापरले आहेत. एखादा मुद्‌दा अथवा घटक वाचकांना समजून सांगत असताना अनेक संदर्भ देऊन तो मुद्‌दा सांगणे हे या ग्रंथाचे वेगळेपण आहे. हा ग्रंथ वाचत असताना इंग्रजी, हिंदी व मराठीमधील अनेक प्राचीन व दुर्मिळ महत्त्वाच्या ग्रंथांची आपल्याला ओळख होते. अगदी मराठीमधील संत, पंत आणि तंत यांचा देखील ते मध्ये मध्ये आवश्यकतेनुसार दाखला देत असतात. तुकाराम महाराज, संत नामदेव, संत चोखामेळा, तसेच काही सुफी संताच्या काव्याचा उल्लेख वाचकांना खिळवून ठेवतो. हा ग्रंथ तसा आकाराने मोठा आहे. पण एकदा तो आपण वाचायला सुरुवात केली की त्यामध्ये वाचकांना गुंतून ठेवण्यासाठी लेखक यशस्वी झालेले आहेत. या ग्रंथाचे अजून एक वैशिष्ट्य आपल्याला सांगता येईल ते म्हणजे कसबे यांनी ग्रंथाची साधारपणे १९ पानांची दीर्घ आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना आणि

समारोप एकत्रित सुरूवातीलाच केलेला आहे. यामधून देखील वाचकांना अनेक गोष्टी समजून घेण्यासाठी मदत होते. अशा पद्धतीचा प्रयोग साहित्य विश्वात नाही. ते आपल्या या प्रयोगाविषयी लिहितात, "वास्तविक पाहता एखाद्या ग्रंथाची प्रस्तावना आणि समारोप एकत्रित छापण्याची पद्धत नाही. परंतु हा ग्रंथ एका लेखन प्रकल्पाचा शेवट असल्याने तसे करणे आवश्यक आहे. म्हणून या दोन्हीही गोष्टी एकत्रित लिहिण्याचे ठरविले."

मानवाने त्याच्या उत्पत्ती पासून ते आतापर्यंत जी काही सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रगती केली. याचा शोध कसबे यांनी या ग्रंथांमधून घेतला आहे. मानवाच्या विविध विकास अवस्थांचे वेगवेगळे टप्पे त्यांनी समजून सांगितले आहेत. मानव आणि विश्व, मानव आणि धर्म, धर्म आणि विज्ञान, यांच्यामधील संघर्ष या सर्व घटकांवर त्यांनी भाष्य केलेले आहे. डॉ. कसबे एका ठिकाणी लिहतात, "माणसाच्या आणि त्याने निर्माण केलेल्या समाजाच्या शक्य तेवढ्या सर्व अंगांना समजून घेण्याचा मार्ग धर्मचिकित्सेतून सापडतो." याचा अर्थ धर्म व धर्माची चिकित्सा ही अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या काळाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आपल्या लक्षात येते की देशभरात आणि जगभरात धर्म नावाची गोष्ट मानवी जीवनाला कशा पद्धतीने प्रभावीत करत आहे. देव, धर्म व देश यांच्या नावावरून माणसामाणसात वाद निर्माण करून दंगली घडवून आणायच्या गोष्टी होत आहेत आणि या सर्वांमध्ये बळी जातो आहे, तो फक्त सर्वसामान्य माणसांचा. म्हणून माणसाला माणसासारखे जगता आले पाहिजे. भारतीय संविधानाने दिलेल्या हक्क आणि अधिकारांचा त्याला वापर करता आला पाहिजे. इत्यादी अनेक प्रश्नांची अत्यंत परखड अशी चिकित्सक हा ग्रंथ करतो. म्हणून महाराष्ट्रांतील नव्हे तर जगभरातील वाचकांनी हा ग्रंथ वाचला पाहिजे.

वाचकाला चिंतन मनन करण्यास भाग पाडणारा व चिकित्सेच्या वाटेवर घेऊन जाणारा हा ग्रंथ वाचकांनी, अभ्यासकांनी तसेच संशोधक विद्यार्थीनी वाचून त्यांच्या मनात प्रश्न विचारण्याची व प्रत्येक गोष्ट तपासून पाहण्याची दृष्टी निर्माण होवो.

## मराठी पुस्तक परीक्षण तृतीय क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : आल्फिया जावेद पठाण
विभाग : भौतिकशास्त्र (Physics) M.Sc. द्वितीय वर्ष
पुस्तकाचे शीर्षक : दुष्काळाशी दोन हात [चरित्रकथन]
लेखक : अरविंद जोशी
सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
पृष्ठे - १५२

**लेखकाविषयी** : श्री अरविंद जोशी हे नाव लेखनाच्या क्षेत्रात नवे नाही. एक गुणज्ञ आणि विधायक दृष्टी असणारा पत्रकार म्हणून ते सुपरिचित आहेत. अरविंद जोशी यांनी गुणीजनांची मांदियाळी हा व्यक्तिदर्शनाचा संग्रह लिहिला आहे. ओसाड मळा देखील रसाळ फळे देऊ शकतो. अशी अदम्य आशा शेतक-यांच्या ठायी निर्माण करणाऱ्या एका झुंझार आणि ध्येयमग्ण माणसाची जीवनकहाणी लेखकांनी 'दुष्काळाशी दोन हात' या चरित्रपर ग्रंथातून अतिशय प्रत्ययकारी शब्दात मांडली आाहे.

**पुस्तकाविषयी :** 'दुष्काळाशी दोन हात' या चरित्रग्रंथात लेखकांनी स्वातंत्र्यकाळात दुष्काळाशी झुंझत असणाऱ्या महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याची परिस्थिती वर्णिली आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्रात सर्वात कमी पावसाचा जिल्हा. सततच्या दुष्काळामुळे तो सतत आगीत भाजताना दिसायचा. शेतकऱ्यांची विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांची दैन्य अवस्था रोजची मीठभाकरी भागवण्यासाठी आणि दुष्काळात टिकाव लागण्यासाठी घरासमोरच्या दावणी रिकाम्या कराव्या लागत असत. एकेक जनावर खाटकाच्या हवाली करून शेतकरी अधाशी व्हायचा; पाऊसपाणी झालं की पुन्हा तडजोडीला लागायचा. कुठं सगळं थाऱ्यावर येतंय तोपर्यंतच पुन्हा दुष्काळ दारासमोर ठाकलेला असायचा. ही सोलापूर जिल्ह्याची कहाणी लेखक सिद्धप्पा आणि पर्वतम्मा या नवरा-बायकोच्या पात्रातून या पुस्तकात मांडतात. ज्याच्या ठायी जमीन-जुमला नाही अशा वेळी खेड्यातून शहराकडे प्रस्थान होणे साहजिक असतं. वाढत्या शहरीकरणाची कारणेही

लेखकांनी या पुस्तकात मांडली आहेत. काही लोक संपत्तीचा पारा सोडून जात नसत. कधीतरी चांगले दिवस येतील या आशेवर चिवटपणानं  तिथंच राहतात.

अशा परिस्थितीत वि. ग. राऊळ वाढत होते. त्यांचं स्वप्न आय.सी.एस. व्हायचं होतं. पण परिस्थितीनं मॅट्रिकच्या पुढं शिकू दिलं नाही. कुटुंबाचा खर्च भागवण्यासाठी राऊळांनी तलाठी पदासाठी अर्ज केला आणि पुढचा प्रवास तलाठी म्हणून चालू झाला. राऊळांना लहानपणापासून शेतीची आस्था होती. दुष्काळाशी सामना करण्याची एक आगळी शक्ती त्यांच्या ठायी वास करून होती. त्यांनी नोकरी करता करता शेतीची पुस्तकं वाचायला सुरुवात केली. त्यांची ग्रामविकासपदी बढती झाली. त्याच काळात राऊळांना महसूल खात्यात काम करण्याची संधी मिळाली.

दुष्काळग्रस्त कुटुंबातल्या ५५ वर्षे उलटलेल्या वृद्धांना सरकार तर्फे डोल नावाची आर्थिक मदत दिली जायची. त्यावेळी राऊळ डोल वाटप करण्यासाठी एका गावात गेले असता लोकांशी गप्पा मारताना त्यांना चिंचेचे वरदान समजलं. दुष्काळ असला की या झाडाला भरघोस पीक येतं. राऊळांच्या डोक्यात ठिणगी पेटली. जर प्रत्येकाच्या शेतात चिंच असेल तर दुष्काळाशी लढणे सोपं पडेल. पण हे मानणारं कोणीच नव्हते. अशावेळी राऊळांना संधी चालून आली ती महणजे पंडित नेहरूंनी दिलेले शेतकयांना आवाहन आणि त्यातून उदयास येणारी शेतकरी मेळावा आणि शेतकऱ्यांची पस्तीस दिवसांची भारत-दर्शन सहल. जिल्हाधिकारी आर.एस. झुवेरी यांना राऊळांच्या अभ्यासाविषयी पुर्णपणे माहिती होती. त्यांनी राऊळांना सहाय्यक अधिकारी म्हणून सहलीसाठी निवडले. 1960 साली मेळावा आणि नंतर पं. नेहरूंनी आवाहन केल्याप्रमाणे भारत-दर्शन सहलीची योजना. या सहलीमध्ये सोलापूर जिल्ह्यातल्या ११ तालुक्यांना रेल्वेचा प्रत्येकी एक डबा अशी ८८० शेतकऱ्यांची सहल होती.

दुष्काळाला तोंड देण्याची धडपड असणारं दुष्काळी परिस्थिती वर्तविणारे आणि विचार करायला लावणारे ते दिवस. यातून निघणारा मार्ग हे सर्व बदलण्याची राऊळांची तळमळ या पुस्तकातून व्यक्त होते. राऊळांच्या मनात सतत एकच विचार यायचा तो म्हणजे, 'दुष्काळानं विस्थापित

होणारा शेतकरी स्थिर झाला पाहिजे.’ राऊळांना उत्कृष्ट ग्रामसेवक, उत्कृष्ट तलाठी असे पुरस्कारही मिळाले.

एखादया माणसाची महत्वाकांक्षा तीव्र असली की तिच्या पूर्ततेचे मार्ग त्याला आपोआप सापडायला लागतात आणि पुढे असलेली संधी त्याच्यापुढं स्वत: होऊन हात जोडून उभ्या राहतात. त्याप्रमाणे राऊळांसाठी शेतकरी मेळावा आणि भारतदर्शन सहल या दोन संधी चालून आल्या. पस्तीस दिवसांची ही सहल. यात भारतातल्या विविध राज्यातील शेतीत सुरू असलेले नवे प्रयोग बघायला मिळाले. सहलीदरम्यान राऊळांना विकासाची दृष्टी असणारे लिमये यांचा सहवास लाभला. यातून एक सनदी अधिकारी कसा वागतो आणि कसं नियंत्रण ठेवतो हे राऊळांनी जवळून पहिले आणि ते आत्मसात केले. पुढे जाऊन राऊळांसाठी एक संधी चालून आली ती म्हणजे 'कृषीशास्त्राचच्या पदवीचं शिक्षण देण्याची योजना' आणि राऊळांनी संधीचं सोनं केलं. अकोल्याहून पदवीचे शिक्षण घेऊन येताना त्यांच्यासमोर एकच ध्येय होतं, ‘सोलापूर, जिल्हयातल्या शेतकऱ्यांना स्थिर करायचं असेल तर कमी पाण्यावर येणाऱ्या बागांचा शोध.’ यानंतर राऊळांना बढती मिळून ते कृषी अधिकारी झाले. त्यानंतर पुन्हा सहाय्यक जिल्हा कृषी अधिकारी म्हणून बढती मिळाली. शेतकऱ्यांशी नातं ठेवून त्यांनी डाळिंबाचा शोध घेतला आणि मग मार्केटिंग. राऊळांनी एक बदल केला तो म्हणजे आधी मार्केटिंग आणि मग उत्पादन. कमी पाण्यातदेखील शेतकरी डाळिंब, बोर, चिंच अशी पिके घेऊन लाखो रुपये कमवू शकतो हे त्यांनी दाखवून दिले. बांधावरचं झाड शेतात कसं आणावं म्हणून राऊळांनी हा प्रयोग स्वतः घरी केला आणि यशस्वीरित्या पार पाडला.

**वैशिष्ट्ये** : 'दुष्काळाशी दोन हात’ नावाप्रमाणेच दुष्काळालाही खाली पाडेल अशा उमेदीवर जगणारं हे आगळं-वेगळं वि.ग.राऊळ याचं व्यक्तिमत्व. शेतीविषयी संवेदना आणि आशेचं जाळं विणणारे हे पुस्तक युवकांसाठी मोठे प्रेरणास्थान होऊ शकतं. फक्त शेतकरीच निसर्गावर पूर्णतः अवलंबून असला तरी तो विज्ञानाची कास धरून प्रकृतीचा आधार घेऊन मोठी झेप घेऊ शकतो. स्वतःच्या कष्टाची किंमत स्वतः ठरवू शकतो हे सांगून जाणारा हा एक सुवर्ण ग्रंथ आहे.

विशेषत: शेतक-यांसाठी आणि शेतीसाठी धडपड करणाऱ्या व्यक्तीला हा ग्रंथ एक दिव्य ज्ञानापेक्षा कमी भासणार नाही. कोणत्या परिस्थितीत कोणतं पीक उत्तम असू शकतं याचा अंदाज आपल्या मनामध्ये या पुस्तकाचं सखोल वाचन करून बांधला जाऊ शकतो. शेतीविषयक प्रश्नांचे चिंतन, त्यावर सुचवलेले उपाय यामुळे शेतकऱ्यांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शक ठरू शकेल.

माळाला मळा बनविण्याचे स्वप्न उराशी जपणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वि ग. राऊळांची ही जीवनकथा निश्चितच प्रेरक ठरू शकेल. कारण 'दुष्काळाशी दोन हात 'करू पाहणाऱ्या वि. ग. राऊळांसारख्या कृषीभूषणाच्या कृतीशूर अशा दोन हातांची ही कहाणी आहे.

## इंग्रजी पुस्तक परीक्षण प्रथम क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : श्रीस्टी (Shristy)
विभाग : राज्यशास्त्र (Political Science) प्रथम वर्ष
Book Title : Bipin : The Man Behind The Uniform
Author : Rawat Rachna Bisht
Publisher : Penguin Random House India, Haryana (2023)
Pages : 207 ISBN : 9780670097197

Striding into the aisles of Jayakar Library and glancing at the bookshelves, a red book caught my eye. It was none other than BIPIN by Rachna Bisht Rawat. General Bipin Rawat, on the cover page in his olive-green uniform, decked with accolades bearing witness to his devotion to the nation. Being a defence aspirant, I stood enamoured for a few seconds, holding onto the lanyard of my library card. I raced to the counter to issue the book and finished it on the day itself.

The book narrates the tale of a Pahadi boy reaching the pinnacle of success by holding the appointment of the first Chief of Defence Staff. Through the collection of various interviews, the story unfolds as to how his family, friends, comrades, subordinates, and close associates knew the General transcending the persona he had in his uniform in distinct stages of his life.

Not only did the general manage to have an indelible impression on those who were around him but also left his imprint on the nation. Charismatic to the degree, that on his unfortunate demise in a helicopter crash, the whole country came in solidarity to mourn the great loss. The author throws insights into his integrity courage, determination, commitment, modesty, and above all his ability to connect and forge deep bonds with his men and comrades alike. The General never misused any of the facilities he was entitled to use throughout his tenure, he always sought the welfare of his men rolling out policies that would benefit those at the lowest level of the hierarchy of command. His story inspires a generation of

students akin to me who harbour the dream of serving in the armed forces. Life in the army is challenging indeed, it requires proving mettle in every situation. However, what struck a chord for me was despite being brilliant, the recipient of the sword of honour from IMA, General Rawat has had his fair share of failures. I, for one, draw strength from it, the motive to keep moving forward in the face of failure is what true valour is.

The author has done a commendable job in bringing him to life. The format is similar to epistolary novels, causing it to become repetitive at the beginning of each chapter. Every chapter starts with the poignant incident of the interviewee receiving the devastating news of the helicopter crash and their reactions to it. However, the writing has a personal touch to it and left me emotional in various instances. Despite knowing how the book will end, reading the last few chapters, left me utterly heartbroken. It casts light on the grim reality of how unpredictable life is in the armed forces and howdifficult it is to cope with the loss of a loved one. Since the book is the biography of an eminent general, it discusses and mentions policies related to the armed forces, the internal security situation, and the General's visionary integrated theatre command standing on the verge of being reified.

I'd recommend this book to those who are striving hard for self-improvement, along with those who are intrigued by the military way of life, and an essential reading for those who aspire to be a part of it. ‘BIPIN: The Man Behind The Uniform’, is curated for those drawn to stories of resilience and leadership.

# इंग्रजी पुस्तक परीक्षण द्वितीय क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : जितमित्र कुलकर्णी
विभाग : तत्वज्ञान (Phylosophy) M.A. प्रथम वर्ष
Book Title : Art for Begginners
Author : Dani Cavallaro (Illustrated by Carline Vago-Hughes)
Publisher : Orient Blackswan Pvt. Ltd., Hyderabad. 2011.
Pages : 185. ISBN : 9788125019152

**Review:**

The reason behind choosing the book was despite having a background of art. I've never came across any sort of content which philosophises it systematically. The name of the books clearly states the nature of it. What is art? What is an Artist? And many more questions like these are asked and tried to answer it also. But the book doesn't claim the definition of anything but tries to explain it in social.

**Political and Philosophical Aspects:**

The book helps us understand various understanding of art in various time periods and in different cultural groups. Both the aspects have been discussed in order to understand art as a whole which are the thought of it and then. ItsPracticality.

The style that has been used to present the ideas about art and the things which are related to it, is very interesting and engaging. In today's terms. The 'Interface' of the book is different from other regular books in an obvious manner. It is because the author might have thought that the content is about, art and artists why shouldn't be the way in which it is being presented, artistic. The style is very similar to the way in which all the 'comics' are being or have been written. The concepts are explained by the philosophers as if they themselves hare explaining to us. This type of writing can be very amusing and easy to understand, make it interesting of the same time.

Due to the limit of time, the topics that have been covered are limited. The book truly havean amazing and useful into on art but only some of it has been read.

- Art: There is no definite or exact definition of art, given by any philosophers of scientists. But when looked across the time it is realized that it is an Visual representation of world itself. The examples are given from different times for example they have mentioned the art of a cave person and also compared it to modern art which is closer to the naturalistic approach of representation at the physical world. But common thing across them would be the urge to express something through it and this thought in very insightful. These art forms represents their cultures from the period in which it has been produced.
- Artist an Aesthetic: In these topics the urge of the artist is explained where the causal conditions of it are discussed. The 'why' of it has been described? What artists were at their contemporary period and what kind of impact did they made on their society. They were considered as an intellectuals which had the capacity to produce something.

  Later on the aesthetic value of a work of art was discussed by many famous Philosophers like Plato, Aristotle, Marks and Engels. Their definition and opinions on what art is and its importance. In our daily life as well as social life.Truly the book has explored every possible way of describing and understand art the way it is. Using Very interesting method of presentation. As an introduction and more, the book has useful information on it, which makes it a 'Must Read'.

# इंग्रजी पुस्तक परीक्षण तृतीय क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : जान्हवी रविंद्र निंबर्ते
विभाग : इंग्रजी (English) M.A. द्वितीय वर्ष
Book Title : Sapiens: A Brief History of Humankind
Author : Yuval Noah Harari
Publisher : Penguin Random House, 2015. Pages : 512
ISBN : 9780099590088

**Genre and Context:** Sapiens belongs to the non-fiction genre, specifically the fields of history, anthropology, and philosophy. It was first published in Hebrew in 2011 and was later translated into English in 2014. Harari, a historian at the Hebrew University of Jerusalem, provides a sweeping. Thought provoking examination of the history of Homo sapiens, starting from the cognitive revolution 70,000 years ago to the present-day challenges humanity faces in the era of artificial intelligence and genetic engineering.

The book is set against the backdrop of a world rapidly transforming due to technological and scientific advances Harari's work holds immense cultural significance as it attempts to engage with deep questions about the human condition, progress, happiness, and the ethical future of mankind. It's a modern philosophical and historical inquiry that resonates especially in today's context, where global challenges like climate change, inequality, and artificial intelligence are creating uncertainty about humanity's future. In addition, Sapiens is part of a broader cultural shift where popular science books have begun to captivate a wider audience. Making complex ideas in anthropology and history accessible to a lay readership.

**Initial Impression:** Upon first encountering Sapiens, I was struck by its ambitious scope an exploration of the entire history of the human species in just over 400 pages. Given my interest in both history and philosophy, the idea of

distilling such an expansive topic into a cohesive narrative intrigued me. The premise of examining human history through a lens that blends scientific, historical, and philosophical perspectives seemed both daunting and captivating. Harari's ability to communicate big ideas with clarity, combined with his reputation for challenging established narratives, made me eager to see how he would unravel the story of humanity and its future.

**Summary Plot Review:** Sapiens is structured as a thematic history of humankind rather than a conventional narrative Harari organizes the book into four main parts the Cognitive Revolution, the Agricultural Revolution, the Unification of Humankind, and the Scientific Revolution.

**The Cognitive Revolution** is described as the key event that allowed Homo sapiens to differentiate themselves from other species, developing complex language, Social organization, and the ability to create shared myths. Harari argues that the power of these myths, whether religious, political, or economic, allowed Homo sapiens to cooperate in large groups and become the dominant species on the planet.

**The Agricultural Revolution**, which took place about 12.000 years ago, marks the transition from hunting and gathering to settle farming societies. Harari challenges the traditional view of this as a progressive step for humanity, instead arguing that it led to inequality, the exploitation of both humans and nature, and the rise of rigid social hierarchies. This shift also caused significant environmental changes that still affect us today.

The third section, **the Unification of Humankind**, discusses how the emergence of empires, global trade, and universal religions began to integrate previously isolated human societies Harari explores how these unifying forces laid the foundation for the modern world.

The final section, **the Scientific Revolution**, examines the last 500 years of human history; exploring the rise of modern science, capitalism, and industrialization. Harari contends that while these developments have greatly improved material conditions for humans, they have also brought unforeseen consequences, including environmental degradation, colonialism, and the ethical dilemmas of technological advancements.

Harari concludes with an exploration of the **future of humanity**, asking whether we are on the brink of transforming into something entirely new, either through biotechnology, artificial intelligence, or other radical scientific advancements He poses the question of whether Homo sapiens, as we know it, will even survive the next few centuries.

**Themes:** Sapiens explores several key themes:

1. **The Power of Shared Myths**: Harari's central thesis is that Homo sapiens ability to believe in shared myths-whether in the form of religions, nations, corporations, or ideologies is what has allowed us to cooperate in large groups and achieve extraordinary feats. This theme challenges readers to rethink what is "real" in our lives and consider how much of our world is shaped by imagined concepts

2. **The Consequences of Progress**: A major theme of the book is the idea that what we consider "progress" often comes at a hidden cost. Harari examines how the so-called advancements of the Agricultural and Scientific Revolutions, while improving humanlives in some ways, have also led to inequality, environmental destruction, and a diminished sense of personal fulfilment

3. **Happiness and Human Well-being**: Despite all out technological and socialprogress, Harari questions whether human happiness has actually increased over time He challenges the reader to consider whether material wealth and social advancement equate to greater well-being

4. **Human Impact on the Environment**: Harari also discusses how Homo sapiens has altered the planet, from causing the extinction of other species to drastically altering ecosystems. The theme of environmental destruction is crucial, especially as humanity faces climate change and other ecological crises.

5. **The Future of Homo sapiens**: Harari speculates on the future trajectory of humanity with the advent of genetic engineering, artificial intelligence, and other breakthroughs, he asks whether Homo sapiens will remain the dominant species or whether we will evolve into something entirely new.

**Setting:** The setting of Sapiens is not confined to a particular time or place but spans the entire globe and covers the full expanse of human history. Harari takes readers from the African savannas where Homo sapiens first appeared, to the ancient civilizations of Mesopotamia, to the empires of the modern world. The setting serves not as a backdrop but as an essential element in understanding how human societies have evolved and how our choices have shaped the planet Farari's exploration of various historical settings allows the reader to see the interconnectedness of human societies and the global impact of human actions.

**Characters:** In Sapiens, the "characters" are not individuals, but rather broad societal forces and trends Harari delves into the role of humanity itself as the central "character" and explores how its behaviour-shaped by cognitive abilities, cultural narratives, and technological advancements has impacted the world. Instead of focusing on famous historical figures, he concentrates on collective human endeavours and how large-scale forces such as religion, imperialism, and capitalism have shaped the course of history. While this approach may seem impersonal, it provides a wider lens through which to view human progress and downfall

**Writing Style:** Harari's writing style is one of the book's greatest strengths. His prose is accessible, clear, and engaging, making complex historical, scientific, and philosophical ideas digestible for a broad audience. He doesn't shy away from

using humor and irony, which helps to humanize his writing and keeps the reader engaged even when discussing challenging or dense material. While the book is packed with facts and information, it never feels overwhelming due toHarari's concise and well-organized delivery His tong is conversational yet intellectual, inviting the reader to critically reflect on the implications of his insights.

**Character Development:** Since Sapiens doesn't follow individual characters in the traditional sense, there is no conventional character development. Instead, the development of sicas and theories about humanity is at the heart of the book Harari's ability to develop complex concepts and challenge conventional wisdom allows readers to grow intellectually alongside the narrative. The real development here is in the reader's understanding of human history and society.

**Plot Structure:** The structure of Sapiens is thematic, rather than strictly chronological, and this approach works exceptionally well for the book's broad scope. Harari doesn't simply recount events in linear fashion but connects disparate historical phenomena to show how they have influenced each other and contributed to the development of human societies. The book is divided into manageable sections, with each focusing on a different revolution in human history. The pacing is steady, though some readers may feel that Harari skips over details in favour of exploring grand themes

**Themes and Messages:** Harari effectively conveys his themes, especially the idea that many of humanity's greatest advancements have come with unforeseen consequences. The message that progress doesn't always equal happiness is a powerful and resonant one, and the critique of our assumptions about civilization is thought-provoking. Harari succeeds in getting the reader to question what "progress" means and whether it is truly beneficial for the well-being of individuals and the planet.

**Emotional Impact:** While Sapiens is not an emotionally charged book in the traditional sense, it has a profound emotional impact through its intellectual depth.

The book leaves readers reflecting deeply on humanity's future, our responsibility to the planet, and the ways in which our societies have shaped our lives. Harari's exploration of humanity's achievements and failings invites a mixture of awe, concern, and contemplation.

**Strengths & Weaknesses:**

**Strengths:** The strengths of Sapiens lie in its ability to make complex ideas accessible, its intellectual rigor, and the thought-provoking questions it raises. The book's scope is ambitious, yet Harari handles it with case, offering insights that challenge conventional wisdom and push readers to reconsider their understanding of history and progress. The writing style is both engaging and intellectually stimulating.

**Weaknesses:** While Sapiens is compelling, some may find its broad approach overly simplistic at tunes Harari glosses over certain historical periods and events in order to focus on larger themes Additionally, some readers may wish for a deeper exploration of specific historical figures or events rather than a more generalized overview

**Personal Reflection:** Reading Sapiens was an eye-opening experience. It made me reflect on the fundamental assumptions 1 hold about the progress of civilization and the direction humanity is heading Harari's insights about the cognitive, agricultural, and scientific revolutions challenged my thinking about the costs of progress and the true nature of happiness.

**Relevance:** Sapiens is highly relevant today, especially in light of current global challenges like climate change, artificial intelligence, and the growing divide between rich and poor. Haran's questions about the future of Homo sapiens are crucial as we face new ethical dilemmas and attempt to navigate the complexities of a rapidly changing world.

**Conclusion & Recommendation:** I highly recommend Sapiens to anyone interested in history, philosophy, or the big questions about humanity's place in the world. It is especially relevant to readers concerned about the future of civilization and the ethical implications of technological progress. Its accessible style makes it suitable for a broad audience, from casual readers to those with a deeper interest in the humanities.

**Final Thoughts:** Sapiens is a remarkable book that combines history, anthropology, and philosophy to offer a sweeping analysis of human existence. It challenges readers to question their assumptions about progress, happiness, and the future of humanity Yuval Noah Haran's ability to condense complex ideas into a compelling narrative makes this book a must-read for anyone interested in understanding where we came from and where we might be headed.

## कथा-कथन स्पर्धा प्रथम क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : शुभम सुभाष फरताडे
विभाग : अर्थशास्त्र (Economics)
M.A. प्रथम वर्ष
कथेचे शीर्षक : माझा प्रवास
कथालेखक : डॉ. संजय कळमकर

### माझा प्रवास

तुम्हाला जगातल्या सर्व माणसांचे नमुने पाहायचे असतील ना, तर तुम्ही एस.टी. स्टँडवर तासभर फिरा. फक्त फिरताना आपल्याला कोणी नमुना म्हणून पाहत नाही ना याची काळजी घ्या. कसं असत वातावरण, छान अशी गर्दी असते. खेड्यातल्या बाया, मध्येच बोचकी आणि पोरं घेऊन बसलेल्या असतात. एस.टी. आली की, बोचकं आधी की पोरगं आधी उचलायचं? अशी त्यांची त्रेधातिरपीट उडते. पळा पळा, इकडे पळ तिकडे पळ असं त्याचं सुरु असतं. एखादा दाढीवाला दांडगा बोकड सलूनचे दुकान शोधत फिरल्यासारखा गर्दीत सर्वांना ढूसण्या देत  फिरत असतो. एखादा सूट-पँण्टवाला जंटलमन, खरं म्हणजे मी विमानाच्या प्रवासाच्या लायकीचा; पण चुकून आज एस.टी. साठी आलोय, असा तिरस्कृत चेहरा करून स्वतःचं अंग चोरून उभा असतो. एका कोपऱ्यात कॉलेज मधल्या तीन-चार मुली, आपण कुठेच पाहत नाही असं दाखवत सभोवार पाहत उभ्या असतात. त्यांच्या शेजारीच college मधला एक मरतुकडा, डोलकाठीसारखा एक तरुण उगाचच आपल्या केसावरून हात फिरवत असतो. Controller नावाचा एक माणूस म्हसोबा सारखा बसलेला असतो, तो हसलेला कोणीही, कधीही पाहिलेलं नाही. त्याचं सांगणं आणि हवामानाचे अंदाज यात फारसा फरक नसतो. आपण विचारतो, एस.टी. गेली का?" तो गेली म्हणाला की समजायचं गेलेली नाही. वर न पाहता तो एस.टी. चं नाव सांगून

टाकतो, अशा त्या स्टँड वरच्या गमती असतात. एखादी एस.टी. आत येते. कुत्र्याने मांसाचा लचका तोडावा, तसा गर्दीचा लचका तोडते आणि पसार होते. बाकीची गर्दी ती जखम भरून काढते. सरोवरात दगड मारल्यावर जशा लाटा उसळतात,तशी एस.टी. आली की गर्दीत लाटा उसळतात.

मला गावी जायचं होतं. मी पण त्या गर्दीमध्ये सामील होऊन त्या गर्दीतलाच एक होऊन फिरत होतो. खरं म्हणजे गर्दी खूप आणि खरं म्हणजे एस.टया येत होत्या, जात होत्या. प्रतीक्षेने प्रेम वाढतं असं म्हणतात पण उशीरा आलेल्या एस.टी. विषयी प्रेम वैगेरे काही वाढत नाही.

एकदाची मला हवी ती एस.टी. आली. एस.टी. आत आल्याबरोबर गुळाच्या ढेपेच्या छिद्राशी मुंगळे गोळा व्हावेत, तसं भरभर प्रवासी त्या एस.टी.च्या दरवाजाशी गोळा झाले. हातात असेल नसेल ती गोष्ट खिडकीच्या आत टाकून आपापली जागा reserve करायला सुरुवात झाली. सुदैवाने एस.टी.च्या खिडकीला गज आहेत. नाहीतर स्त्रियांनी आपापल्या यांनाच आत टाकले असते. माझ्याजवळ टाकाऊ म्हणून आत टाकण्यासारखे काहीच नव्हते, म्हणून कितीही लोभी चोर जरी असला तरीही चोरुन नेणार नाही अशी पायातली तुटकी चप्पल आत टाकली. गर्दीमुळे दुसरं पायतान कुणाला दिसण्याचा संबंधच नव्हता, पाय फरकवत फरकवत दरवाजाजवळ आलो. दरवाजात प्रचंड गर्दी. एकदाचे वरचे प्रवासी खाली उतरले आणि धरणाचा लोंढा फुटून पाणी भसकन आत शिरावं तसे खालचे प्रवासी एकदाचे वर चढले. त्या गर्दीमध्ये एक स्त्री पटकन वर चढली, आणि तिने थाटाने आपल्या पतीला घेण्यासाठी असा हात पुढे केला. तर तिच्या हाताला धरून दुसराच कोणीतरी वर चढला. मी सौजन्य वगैरे बाजूला सारून खाली डोकं घालून ढुसण्या देत असा आत शिरलो. दरवाजामध्ये एक महाकाय काळया रंगाचा माणूस, बाजीप्रभूंनी खिंड

अडवावी असा दरवाजा अडवून उभा राहिला. वर यायचं नाही, जागा नाय. खालचे बरेच प्रवासी मनात म्हणायला लागले, "अरे बाबा तुझ्या जागी आम्ही चार-पाच जण बसू शकतो. उतर खाली" पण तसं म्हणायची कोणात हिंमत नव्हती.

कंडक्टर नावाचा खाकी प्राणी आला. तो दरवाजात आला. महाकाय पण दरवाजातच उभा होता. कंडक्टर मोठ्याने ओरडला, मी कंडक्टर आहे, मला वरी येऊ दी. महाकायने एक हात वर केला. महाराजांनी अफजलखानाच्या बगलेत शिरावं तसा कंडक्टर वर चढ़ला. दरवाजामध्ये वटवाघूळासारख्या लटकणाऱ्या एक दोघांना एका फटक्यात बाजूला करून, महाकायने दणक्यात दरवाजा लावून घेतला.

मी आपला गर्दी तुडवत-तुडवत सीट reserve केलेल्या जागी पोहचलो. अरे इथंच सीट होती. इथंच पायतान टाकलं होतं मी तर माझ्या आधी तिथं एक म्हातारा बसलेला. भांडणं झालीच तर हा आपल्या आवक्यातलाच याचा अंदाज घेऊन मी आवाज वाढवला, 'बाबा उठा'

बाबा - का? (बाबा शांतपणे म्हणाले)

मी - का म्हणजे१ माझी चs चs चs

समोर उभी असलेली एक तरुणी आमचं संभाषण कान देऊन ऐकतेय हे लक्षात येताच मी एकदम गप्प झालो. आता चपलेचा उल्लेख करणं मूर्खपणाचं ठरलं असतं पण बाबांनी ते बरोबर हेरलं, खाली वाकुन त्यांनी माझ्या पायतानाचा तुटका अंगठा बोटाच्या चिमटीत पकडावा तसा पकडला. माझ्या डोळ्यासमोर आणून ती मेलेल्या उंदरासारखी हलवायला सुरुवात केली. "हेच का ते तुमच, चs चs चs?" पायातलं दुसरं पायतान चटकन सीटखाली सरकवत मी ओरडलो, "छे, ही चप्पल माझी नाय" बाबा बोलले, मग कोणत्या मुर्खाने टाकलीय" आणि मी अहो अहो करतानाच त्यांनी ती खिडकीबाहेर भिरकावली.

चप्पल तर गेली. नंतर मी मागे निघालो तेवढ्यात ती तरुणी सुंदर तरुणी दूध उतू गेल्यासारखं फिसकन हसत त्या बाबांना म्हणाली, “बाबा कशाला त्यांची चप्पल बाहेर फेकली हो तुम्ही?”

मला मेल्याहून मेल्यासारख झाल. कसाबसा मागे निघालो, एका म्हातारीचा पाय माझ्या पायाखाली चिरडला गेला, तिने सुरु केलेल्या शिव्यांवरून तिच मराठी वाडमय अतिशय समृद्ध असाव याची मला खात्रीच पटली.

एकदाचे driver साहेब आहे. त्यांनी मधल्या जाळीतून तुरुंगातल्या कैद्यांकडे पहावं. तस सगळयांकडे पाहिले आणि आता तुमच्या  सगळयांचे जीव माझ्या ताब्यात आहेत असा विचार करून, तो सीटवर बसला व driver साहेबांनी गियर मागे-पुढे केला आणि क्लचच्या मुंडीवर पाय दिला आणि टी.बी. झालेल्या माणसाने खरखर कराव अशी एस.टी. चालू झाली आणि शहराबाहेर पडली.

मला बसायला जागा मिळालीच नाय. मी आपला तपश्चर्येला उभा राहिल्यासारखा एका पायावर उभा होतो. तेवढ्यात नको ती गोष्ट घडली, माझ्या पायाला खाजव आली. कसाबसा खाली वाकून पाय खाजवायला लागलो तसा समोरचा तरुण दबक्या आवाजात ओरडला, काय करताय?' मग माझ्या लक्षात आलं मी माझा समजून त्याचाच पाय खाजवत होतो. थोडया वेळाने माझ्या पायाची खाज आपोआप शांत झाली. कारण मागचा एक माणूस बराच वेळ त्याचा समजून माझाच पाय खाजवत होता.

गाडी मोठ्या विसंगतीने भरलेली होती. समोरच्या आडव्या बाकावर कुटुंब नियोजनाचा लाल त्रिकोण झळकत होता आणि त्याखाली एक जोडपं आपल्या पाच-सहा मुलांना घेऊन बसलेलं होतं. असा विसंगतीने भरलेला हा लाल डबा वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन धावत होता. कंडक्टर वैतागलेला, घाम आलेला प्रचंड गर्दीत तिकीट तिकीट

करत फिरायला लागला. तो असा पुढे जात जात, एक खेड्यातली बाई होती. तिने आपले तिकिटाला पैसे पुढे केले. तिच्या कुशीत चांगला गलेलठ्ठ मुलगा बसलेला होता. खेड्यातली म्हणल्यावर कंडक्टर ने आवाज वाढवला.

म्हणे, “बाई या पोराच तिकीट?”

बाई - “आतापाउत कधी काढलंच नाय”

कंडक्टर - “आता काढा ना.”

बाई - “कमुंन?”

कंडक्टर - “मोठा झालाय तो. कितवीलाय?”

बाई - “साळात नाय जात.”

कंडक्टर - “याचं वय काय?”

बाई - “काय ठाव नाय.”

कंडक्टर - “तुमचाच आहे ना?”

बाई - “ये चिपाडतोंड्या !”

असं म्हणल्या बरोबर कंडक्टरने गर्दीतही आपल्या चेहऱ्यावर हात फिरवून बाईने दिलेली उपमा आपल्या चेहऱ्याशी जुळते का याचा अंदाज घेतला. तोपर्यंत बाकीचे प्रवासी हसायला लागले. चिपाडs चिपाडss चिपाडsss ...

कंडक्टर - “तुमचं पोरग अतिशय तान्ह आहे. मिशा फुटुस्तवर याचं तिकीट काढू नका.”

शेजारी - “धोंड्या एस. टी. चा प्रवास लय भारी रं.”

त्याचा साथीदार - “होय तर, यामुळे मी विमानाने प्रवास करत नाही. आपल्याला अशी थुंकायची सवय, विमानातून पडायचं कुणाच्या अंगावर.” अशी गंमत चालली होती.

एक तरुण शिंकला. तेवढ्यात तिथे जागा झाली. तो अजून एकदा शिंकला आणि तेवढ्यात दुसरा एक तरुण बोलला, “वा! काय ही गर्दी आणि त्यातच ही सर्दी.” म्हणलं गाडीमध्ये कवी दिसतोय. त्या तरुणाच्या शेजारच्या कॉलेजच्या मुलांनी विचारलं, “आपण कवी दिसता.” “कवी दिसावा नाही असावा लागतो.” “आम्हाला जरा मार्गदर्शन करता का? कशाला नाही म्हणजे, कविता कशा वगैरे,” “हो तिकडं, ते काय राजकारण आहे का कोणीही करायला, आणि काय कविता करतात म्हणे आजचे तरुण. माझ्या एका मित्राने कविता केली होती. माझा पायजमा मी सूर्यावर वाळत घालील” जमिनीवरच्या दोऱ्या संपल्या का म्हणे, “काय खरं नाय तुमचं.” “आमच जाऊ द्या, तुमची एखादी कविता.” “माझा प्रेमभंग झालाय!” “मग तर ऐकवा.” “तिने मला धोका दिलाय. दुसऱ्यासोबत लग्न केल, मी चार ओळी खरडल्या आणि लग्नाच्या आदल्या दिवशी तिला म्हणलं थांब. माझ्या प्रतिभेने फोडलेल्या प्रतिभेच्या चार किंकाळ्या ऐकून जा. तिने कविता ऐकली अन् बेशुद्धच पडली. ऐकायची तुम्हाला? ऐकवा म्हणे.”

> माझ्या बरगड्याची हाडं,
>
> तुझ्या लग्नाच्या मंडपाला बांबू म्हणून वापरेन,
>
> माझ्या गुडघ्याच्या वाट्या
>
> तुझ्या मंडपाच्या प्रवेशद्वाराशी पणत्या म्हणून ठेवीन
>
> त्यात माझ्या रक्ताचं तेल आणि हृद्याची वात ते रडायला लागंत.

तेवढ्यात कंडक्टर आले. “ये पलीकडचा, तिकीट काढ.”

> “अहो ओरडता काय असे घसा ताणूनी
>
> प्रामाणिक असे मी, दाखवू काय हृदय फाडूनी”

कंडाक्टर - “तिकीट फाड गप, ते हृदय कुठं फाडीत बसलाय, कुठं जायचय तुला?”

कवी - “आम्हा प्रतीभावंताना तर जगाच्या अंतिम टोकापर्यंत जावेसे वाटते.”

कंडक्टर - अंतिम टोकाचे तिकीट ड्रायव्हर जवळ. माझ्याजवळ सध्या या जिल्हयाच्या अंतिम टोकाचे तिकीट आहे.”

कवी - “ठीक आहे त्यावरच भागवून घेवू. तीन तिकिटे दया. या मुलांची पण.

मुले - “आमची कशाला?’

कवी - ‘तुम्हाला माझ्या कविता ऐकायच्या आहेत.’

एक गाव आलं. कळशीतून पाणी हेंडकाळून पडावं तसे काही प्रवासी बाहेर पडले. मला त्या सुंदर तरुणीच्या शेजारी जागा मिळाली. आम्ही दोघे गप्पा मारत बसलो. सगळ्यांना वाटलं की हे चिलारी बाभूळीच झाड कोमल गुलाबाजवळ कसं काय बसलं. बोलण्याच्या नादात माझा स्टॉप पाठीमागेच राहिला. मग ती सुंदर तरुणी मला तिच्या घरी घेऊन गेली. मोठा बंगला. तिने हाक मारली ‘daddy’ तिचे पप्पा slow motion मध्ये जिन्यावरून चालत खाली आहे. म्हणे “बोल बेटा.” तिने एक पाणीदार वाक्य फेकलं. “Daddy, मी लग्न करेल तर याच तेजस्वी तरुणाशी.” त्यांनी मला अपादमस्तक न्याहळलं.

Daddy - “चप्पल नसलेला हा तेजस्वी तरुण तुला कुठे सापडला?”

मग तिने सारं वर्णन केलं आणि एक वाक्य फेकलं, “Daddy लग्न प्रेम पाहून करावं, चप्पल पाहून नाही.” ते ऐकून daddy सादळलेल्या पापडासारखे सादळून गेले. मग लवकरच धूमधडाक्यात आमचं लग्नं लावून दिलं. हनिमूनला काश्मीरला जायचं ठरलं. Daddy म्हणाले, “हेलिकॉप्टर मध्ये जा.” आता सासरेच म्हणल्यावर ही कशाला नाही म्हणणार. आम्ही हेलिकॉप्टर मध्ये बसलो. तिने माझ्या खांदयावर मान टेकावली. हेलिकॉप्टर उडालं. हमिद तेवढ्यात माझ्या खांदयाला कोणीतरी हालवलं. छूड s .छूड s,

मी खाड्कन डोळे उघडले. सभोवार पाहिलं  सारी एस. टी. मोकळी. कंडक्टर समोर हसत उभा होता. म्हणे, “मघापासून काय चाललंय? एकटाच बडबड काय करतो, एकटा मनाशीच काय हसतो, तुझ्या नाकातून एकदा सनईसारखा आवाज आला. म्हणलं त्यावेळेस माझं लग्न सुरु होत. तुझं गाव? म्हणलं गेलं मागं. इथे कोणी आहे का? आता कोण असायचं? झोप डेपोतच. कंडक्टर ने खाड्कन दरवाजा लावून घेतला. आता डेपोमध्ये रात्र काढणे हाच उपाय होता. मी पुन्हा जुनं स्वप्न continue केलं. पुन्हा हेलिकॉप्टर मध्ये जाऊन बसलो. मान टेकवली. खरं हेलिकॉप्टर नसेना का, पण डास नावाची असंख्य हेलिकॉप्टर कानाभोवती फिरु लागली. त्या नादातच माझा प्रवास संपला.

(डॉ. संजय कमळकर)

## कथा-कथन स्पर्धा द्वितीय क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : निशिता सुधीर पेंढारकर
विभाग : गणित (Mathematics)
M.Sc. द्वितीय वर्ष
कथेचे शीर्षक : कस्तुरी
कथालेखक : निशिता सुधीर पेंढारकर

## कस्तुरी

"कस्तुरी! अगं, आवरलं का? उशीर होतोय निघायला. तुझ्या मावशीचा चौथा कॉल येऊन गेलाय आता." कस्तुरीच्या आईने कस्तुरीला हाक मारली. "चल निघुयात मम्मा, मी तयार आहे." कस्तुरी उत्तरली. कस्तुरी आणि मातोश्री निघाले होते गावी जायला. तिकडे कसलीशी पूजा होती. सर्व नातेवाईक येणार होते. गाव म्हणजे कस्तुरीच्या आईचं माहेर. कस्तुरी फार वर्षांनी गावी जात होती. तिने फॅशन डिझायनिंगच्या कोर्सनंतर मॉडेलिंग सुरू केलं होतं. तिथल्या नावाजलेल्या सौंदर्य स्पर्धेत कस्तुरीने प्रथम पारितोषिक मिळवलं होतं. अर्थात, सुंदरता अनेक गोष्टींवर आधारित असते. माणसाच्या मनाची सुंदरता जास्त महत्वाची असते. पण त्यात सुद्धा कस्तुरी बसत होती. कस्तुरीमध्ये ते सर्व गुण होते ज्यामुळे ती सर्वांची लाडकी होती. कस्तुरीला तिच्या सौंदर्याचा फार अभिमान वाटायचा. त्यावरून तिने आजपर्यंत कोणाला हिणवलं नव्हतं. पण अभिमान होता हे मात्र खरं, पण त्याच तिच्या सौंदर्याच्या आड यायचा तो तिच्या कपाळावरील एक बारीकसा डाग, तो डाग इतका बारीक होता की ती सोडून कोणाला दिसायचा देखील नाही. पण कस्तुरी आरशात बघायची तेव्हा तोच डाग तिला अगदी उठून दिसायचा. अगदी लहानपणीचा डाग तो! त्याविषयी तिला काही आठवतही नाही. तर अशी आहे आपली कस्तुरी. आताच काही दिवसांपूर्वी कस्तुरीला एका मालिकेत नायिकेची भूमिका मिळाली होती. काहीच दिवसांत

शूटिंगला सुरुवात होणार होती. सगळे फार खुश होते. तेच विचार कस्तुरीच्या देखील मनात सुरू होते. त्यात ते केव्हा गावी पोहोचले ते तिला कळलंच नाही. गाडी थांबली, कस्तुरीची आई पुढे निघाली. कस्तुरी मागून काही सामान घेऊन येणार होती. ते सामान काढतांना तिला असं जाणवत होतं, की कोणीतरी तिच्याकडे बघतंय. वळून बघते तर कस्तुरी जवळपास दचकलीच! एक मुलगा तिच्याकडे बघत होता. पण दचकायचं कारण असं की, तो खूप वेगळा होता. चेहऱ्यावर बरेचसे घावांचे ठसे उमटलेले, एक भुवई अर्धी उडालेली, कपाळावर टाक्यांचे अवशेष दिसत होते. ओठ, डोळे, कान, नाक प्रत्येक ठिकाणी कसलेसे घाव. त्याला नीट चालताही येत नव्हतं. त्याचा हात सुद्धा किंचितसा वक्र दिसत होता. कदाचित, कोणत्या तरी मोठ्या अपघातातून वाचलेला असावा. कस्तुरीला त्याच्याकडे बघून फार वाईट वाटलं. तिच्यासोबत असं काही झालं असतं तर कस्तुरीने जगणंच सोडलं असतं. तिचा चेहरा, तिचं दिसणं तिच्यासाठी सर्वात जास्त महत्वाचं होतं. तो दरवाज्याजवळ उभा होता. त्याच दरवाज्यातून कस्तुरीला आत जायचं होत. तो एवढा एकटक का बघतोय हे अजूनही कस्तुरीला कळत नव्हते. कस्तुरी जशी दरवाज्याजवळ पोहोचली, तसा तो दात विचकत ओळखीचा हसला. त्याचं हसू कस्तुरीला फार भयावह वाटलं. तिनं हसल्यासारखं केलं आणि ती पटकन आत शिरली. त्याच व्यक्तीसाठी तिला वाईटही वाटत होते, आणि भीतीही वाटत होती. म्हणजे जे झालं ते वाईट झालं, पण ही व्यक्ती पुन्हा आपल्याला दिसायला नको. हेच कस्तुरीला प्रकर्षाने वाटत होतं.

एकीकडे पूजेची तयारी सुरु होती, आणि एकीकडे सुरु होत्या गप्पा. त्या सर्व गप्पा आणि कौतुकाचं केंद्रबिंदु होती, कस्तुरी! तसं तर कस्तुरीसाठी हे नेहमीचं होतं. तरीसुद्धा ती सगळ्यांना विनम्रतेने योग्य तो प्रतिसाद देत होती. अशाच गमती सुरु होत्या. कस्तुरीला त्या व्यक्तीचा विसर पडला. तेवढ्यात तिने बाजूला वळून वळून बघितलं. बघते तर,

तोच व्यक्ती. आधीसारखाच आताही तो अगदी टक लावून बघत होता. आता कस्तुरीला त्याचा राग यायला लागला होता, आणि थोडी भीतीही वाटत होती.

पूजेची सर्व तयारी झाली होती. पूजा सुरु होणारच होती. तेवढ्यात कस्तुरीच्या आईने तिला गाडीमधून एक पिशवी आणायला सांगितली. कस्तुरी निघाली. तिच्या मागे तो सुद्धा यायला लागला. कस्तुरी वेग वाढवत होती, त्याने सुद्धा वेग वाढवला. घराच्या बाहेर आल्यावर अजुन काही मुलं त्याच्यासोबत येऊ लागले. कस्तुरीच्या मनात धडकी भरली होती. तिने घाईत गाडीचं दार उघडलं. त्यातून पिशवी काढली आणि घराच्या दिशेने वळली. तेवढ्यात पिशवी फाटली आणि त्यातलं सगळ सामान खाली पडलं. कस्तुरी ते उचलायला खाली वाकली, तेवढ्यात तोही आला. त्याचा हात कस्तुरीच्या हाताला लागला. कस्तुरी एकदम मागे झाली. आणि क्षणात तिने त्याच्या कानाखाली एक लगावून दिली. "सगळं समजतेय मी. पुन्हा दिसलास, तर अजून खूप काही करता येतं मला. समजलास ना?" कस्तुरी जवळपास किंचाळलीच.

"मंगल!" त्याच्या एका मित्राने त्याला आवाज दिला.

तो वळला आणि त्याच्या मित्रांजवळ गेला. त्याने मागे वळूनही पाहिलं नाही. पण त्याच्या मित्रांच्या नजरा अशा होत्या, जसं कच्च खाऊन टाकतील. कस्तुरी घरात परतली. घडलेल्या प्रकाराबद्दल तिने कोणालाही काहीही सांगितलं नाही. पूजा शांततेने पार पडली. त्यानंतर मंगल तिला दिसलाच नाही. कस्तुरीला वाटत होतं तिने त्याला मारायला नको होतं. पण जे झालं ते अनावधानाने झालं होतं. तिनं काहीही ठरवून केलं नव्हतं. तसंही, तिने काही केलं नसतं तर कदाचित त्याची काही करायची हिम्मत वाढली असती. रात्रभर कस्तुरीच्या डोळ्याला डोळा लागत नव्हता त्याचाच भयावह चेहरा कस्तुरीच्या डोळ्यांसमोर नाचत होता. तो चेहरा मुळत सुंदर, नीटनेटका असावा. ज्या अपघातात त्याचे हे हाल

झाले तो अपघात किती भयानक असेल? त्यात हाच होता? की अजूनही कोणी होतं? कस्तुरीने कुठेतरी वाचलं होतं, 'ज्यांना आपले सौंदर्य गमवावे लागते, त्यांना नंतर प्रत्येक सुंदर गोष्टीची चीड यायला लागते. तसंच कदाचित त्याला कस्तुरीकडे पाहून वाटत असावं. उद्या काय होईल? तो अजून लोक सोबत घेऊन येईल? आपल्याला काही होणार नाही ना? हेच विचार सुरु असताना तिला केव्हा झोप लागली, तिला कळलंच नाही.

सकाळी आईनं तिला लवकर उठवलं. त्यांना परतीच्या प्रवासासाठी निघायचे होते. गाडीत बसताच कस्तुरीने सुटकेचा निःश्वास सोडला. आता तिला त्याचा चेहरा परत कधीच बघायचा नव्हता.

"छान झाली ना सुट्टी? किती वर्षांनी आली होतीस तू गावी, सगळ्यांना आनंद झाला तुला भेटून, फक्त एक काम राहीलं ते राहिलंच. तुझी एका सोबत भेट घालून द्यायची होती. त्याला बोलावलं होतं तसं, तो दिसला होता मला सुरुवातीला, नंतर कुठे गायब झाला कोणास ठाऊक?" कस्तुरीची आई बोलत होती. "कोण गं मम्मा?" कस्तुरीने विचारलं. "मंगल." कस्तुरीला नाव चांगलंच आठवत होतं. "मम्मा तोच का गं... त्याचा चेहरा... मी तुला ना त्याच्याबद्दल विचारणारच होते...तो..." "त्याचे खूप उपकार आहेत आपल्यावर." कस्तुरीचं वाक्य पूर्ण होण्याआधीच आई बोलली. उपकार? त्याचे? कस्तुरीला काहीच समजत नव्हतं. आईनं पुढे सांगायला सुरुवात केली. "तू ना फार लहान होती कस्तुरी. सहा-सात वर्षांची असशील. गावी गेलो की सगळे तुझे फार लाड करायचे. सगळ्याची लाडकी तू. एक दिवशी अशीच खेळता-खेळता तू रस्त्याच्या दिशेने पळत सुटली. तिकडे मंगल आणि त्याचे मित्र खेळत होते. तुला पकडायला म्हणून मी सुद्धा तुझ्या मागे पळाले. पण तेवढ्यात समोरून वेगाने टेम्पो येताना दिसला. मंगल मध्ये आला, त्याने तुला ढकललं. अं... तू विचारतेस ना नेहमी... तुझ्या कपाळावरचा तो डाग...

तेंव्हाचाच आहे तो. तू वाचली, पण मंगल... त्या टेम्पोच्या समोर... टेम्पोचे ब्रेक्स फेल होते... मंगल असा उडवला गेला... रस्त्याच्या बाजूला काटेरी रोपटे वाढलेले होते. थेट तिकडे मंगल पडला. बरीच लोकं जमा झाली. मंगल ओळखुच येत नव्हता. संपूर्ण रक्तबंबाळ झालेला, चेहरा छिन्नविच्छिन्न, हात-पाय कुठे काय काय झालंय, किती फ्रॅक्चर्स काही कळत नव्हतं. बरेच दिवस त्याच्यावर उपचार सुरु होते. कोणाला भेटायला परवानगी नव्हती. नंतर जेंव्हा आपल्याला घरी परतायचं होतं, तेंव्हा आम्ही गेलो होतो त्याला भेटायला. खूप विनंती केली होती डॉक्टरांना. मंगलला बघितलं मी आणि माझं रडू आवरलंच नाही. त्याच्यासाठी पण आणि मनाच्या एका कोपऱ्यात हा पण विचार येत होता की जर तेव्हा मंगल नसता, तर ते हाल माझ्या कस्तुरीचे झाले असते.

तेंव्हा मंगल मला म्हणतो कसा, “काकी, रडताय काय? कस्तुरी माझ्या बहिणीसारखीच. एक भाऊ त्याच्या बहिणीसाठी एवढं तर करूच शकतो ना?” पाचवी-सहावीच्या पोराचे शब्द हे. तू तरी एक डागावर सुटलीस कस्तुरी. मंगल मात्र..." कस्तुरीच्या आईचा कंठ दाटून आला. पुढे फक्त त्यांचे डोळे बोलत होते. कस्तुरी स्तब्ध होती. तिला दिवसभरात घडून गेलेलं सगळं आठवत होतं. तिला अंगातील सारं बळ निघून गेल्यासारखं वाटत होते. ज्या तिच्या सुंदर, नीटनेटक्या चेहऱ्याचा तिला सगळ्यात जास्त अभिमान वाटत होता, त्या तिच्या सौंदर्यामागचं खरं कारण तर मंगल होता. संपूर्ण जन्मात ती ज्याचे ऋण फेडू शकणार नव्हती त्याच मंगलचा तिने चारचौघात अपमान केला होता.

तेवढ्यात तिची नजर गाडीतल्या आरशाकडे वळली. आरशात दिसलं तिला तिचंच प्रतिबिंब. पहिल्यांदा तिला स्वतःला बघून किळस वाटत होती आणि मंगल तिला सगळ्यात जास्त देखणा वाटत होता. खूप खूप राग येत होता कस्तुरीला स्वतःवर. पण पश्चात्तापाव्यतिरिक्त तिच्या हातात काहीही उरलं नव्हतं.

## कथा-कथन स्पर्धा तृतीय क्रमांक



विद्यार्थ्याचे नाव : शुभांगी शिवाजी बाबर
विभाग : विधी (Law)
कथेचे शीर्षक : निर्णय
कथालेखक : अनोळखी

### निर्णय

स्वर्गाला लाजवणाऱ्या त्या शहराची रचना सगळ्यांनाच भुलवत होती. गगनाला भिडणाऱ्या उंच-उंच इमारती कुटुंबाचं शीर्षक देऊन त्या इमारतींना घर मानणारी माणसं, एकदम चकाकणारे रस्ते, मुंग्यांच्या ओळींप्रमाणे त्यावर चालणारी लोकांची गर्दी त्या शहरात ती मात्र एकटीच होती. कुशीमध्ये पांढऱ्या कपड्यात स्वतःच बाळ घेऊन या माणसं राहणाऱ्या कोंडवाड्यात कधी अन्नाचा शोध घेत होती तर कधी उन वाऱ्यापासून वाचण्यासाठी या छताखालून त्या छताखाली जाऊन बसत होती. आज सकाळपासूनच ती उपाशी होती आता मात्र भूक लागली होती. पोटाची भूक भागवण्यासाठी तिथल्याच रस्त्याच्या कडेच्या उकिरड्यावर खाण्यासाठी काहीतरी शोधत होती.

शेजारच्या मारवाड्याच्या चाळीत मात्र काहीतरी गोंधळ चालला होता. "आवरा-आवरा, धावा-पळा" यातून सोनं काढा, त्यातून पैसे काढा. शेटजी सर्वांना हुकूम सोडत होते. आयकर विभागाची धाड पडण्याअगोदर ते सोनं-नाणं नि पैसा-अडका कुठेतरी लपून ठेवायचा होता. तेवढ्यात नोकर पळत आला "शेटजी ते आले" म्हणून मारवाड्याने पटकन एका पांढऱ्या कपड्यात तो माल बिस्तरा बांधला आणि खिडकीतून समोरच्या उकिरड्यावर फेकून दिला. त्याच उकिरड्याच्या पुढच्या रस्त्यावर पिसाळलेली कुत्री लोकांच्या अंगावर धावून येत होती. जीवाच्या भीतीने सगळी लोकं त्या कुत्र्यांपासून लांब पळत होती. ती

मात्र उकिरड्यावर बसून शांततेत सगळं पाहत होती. उकिरड्यावर येऊन कुठल्याही क्षणी तिला आणि तिच्या शेजारी ठेवलेल्या बाळाला फाडू शकणारी आणि तिच्याच दिशेने धावत सुटलेली कुत्री पण आणि शेटजींनी पांढऱ्या कपड्यात बांधून फेकलेला माल पण. दोन्हीही गाठोडी तिच्या समोर होती. एका गाठोड्यात तिचं पुढचं आयुष्य अगदी सुखकर करणारा अमाप पैसा, तर एका गाठोड्यात तिची ममता, तिचं बाळ. यापैकी काहीतरी एकच उचलून, एकच निवडून ती तिथून पळू शकणार होती. ती कुत्री आता जवळ आलेली होती. हे उचलू की ते उचलू या मनाच्या संघर्षात तीनं पटकन एक गाठोडं उचललं आणि धावत भिंतीच्या आडोश्याला जाऊन लपून बसली. तोपर्यंत उकिरड्यावर येऊन त्या गाठोड्याला त्यांनी फाडून-तोडून छिन्न-विछिन्न केलं. हे पाहून तिने एक दीर्घ श्वास सोडला. “बरं झालं मी माझ बाळ घेऊन आले नाहीतर त्या सोन्या-नाण्याच्या लोभापायी मी माझं मातृत्व हरवून बसले असते. हा विचार करून आपल्या गोंडस बाळाचा मुका घेण्यासाठी तिने ते गाठोडे उघडले आणि मग मात्र ती कायमचीच खाली बसली. कारण जे गाठोडं ती सोबत घेऊन आली होती तो तर सगळा पैसा होता आणि जे ती तिथं कायमचं सोडून आली ते तिचं बाळ !